25 TO 31 OCTOBER 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 23/10/2021 9:42 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ४४ सोमवार दि. २५ ऑक्टोंबर २०२१ ते रविवार दि. ३१ ऑक्टोंबर २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## जुन्या दुश्मनीने रस्त्यातच घात केला गिऱ्हाईकाच्या हातून हॉटेलवाला मेला



इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

शुल्लक कारणावरून झालेले भांडण कधी कधी कायमचे दुष्मनीत बदलते आणि त्यातून एखाद्याचा जीव जाण्याची शक्यता असते, असाच काहीसा प्रकार हॉटेल आणि क्लब चालवणाऱ्या एका भाईच्या बाबतीत घडला. त्याच्या हॉटेलमध्ये जेवायला आलेल्या ग्राहक बरोबर त्याचे एकदा भांडण झाले होते. त्यातून हाणामारी सुद्धा झाली. मात्र ग्राहकाने तोच राग मनात ठेऊन एकदा ...पान २ वर

# हुंड्यासाठी सासरच्यांनी तिला चेटकीन ठरवले नरबळी जाणाऱ्या विवाहितेने मृत्यूला हरवले

बारामती/क्राईम रिपोर्टर

या देशाला स्वातंत्र्य मिळून ७० वर्ष उलटली तरी सुद्धा अंधश्रद्धेच भूत लोकांच्या मानेवर कायम आहे. निदान शाहू-फुले-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात तरी अंधश्रद्धेचा हा बाजार नसावा असे वाटत असतानाच इथे जादू टोना विरोधी कायदा असूनही भूत-प्रेत-तंत्र-मंत्र, काळी जादू, वशीकरण यासारख्या भाकडकथांचं स्तोम माजवल जात आहे आणि त्याच्यावर तांत्रिक-मांत्रिक, भोंदूबाबा, कुडबुडे ज्योतिषी स्वतःला देवाचा अवतार असल्याचे घोषित करून दरबार भरवणारे आध्यात्मिक महाराज या सगळ्या लोकांमुळे अंधश्रद्धेची पाळेमुळे घटत होत चालली आहे आणि त्याचाच फायदा घेत काही स्वार्थी लोक आपल्याला नको असलेल्या व्यक्तीचा काटा काढण्यासाठी या अंधश्रद्धांचा उपयोग करून घेत आहेत आणि त्याचेच एक भयंकर उदाहरण बारामती नजीकच्या करंजेपूल गावात उघडकीस आले आहे.




या ठिकाणी एका विवाहितेच्या आई-वडिलांनी हुंडा दिला नाही म्हणून त्या विवाहितेचा शारीरिक आणि मानसिक छळ करून तिला सैतानाचा अवतार ठरवले आणि एका मांत्रिकाच्या मध्यस्थीने तिचा नरबळी देण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने त्या महिलेच्या रडण्याचा आवाज ऐकून शेजारी धावले म्हणून ती महिला वाचली अन्यथा तिचा मृत्यू अटळ होता. या प्रकरणी बारामती पोलिसांनी त्या महिलेची सासू, दोन दीर, नणंद यांच्यासह तिला नग्न करून आपल्यासमोर बळी देण्यासाठी बसवणाऱ्या मंत्रीकालाही अटक केली आह. किती भयानक प्रकार आहे हा! केवळ हुंडा दिला नाही म्हणून एखाद्या महिलेला सैतान किंवा चेटकीण ठरवणे आणि तिचा बळी देण्याचा प्रयत्न करणे हा फार मोठा गुन्हा आहे.




यापूर्वीही काही महिलांना चेटकीण ठरवून त्यांना नग्न करून मारल्याचे किंवा त्यांची धिंड काढल्याचे प्रकार घडले होते. हे प्रकार म्हणजे महाराष्ट्राला आजही दोनशे वर्ष मागे लोटणारे आहेत. महाराष्ट्राची बदनामी करणारे आहेत. तेंव्हा आतातरी जादू टोना विरोधी कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी सरकारने करावी आणि अशा घटना भविष्यात घडणार नाहीत याची काळजी घ्यावी.

बारामती येथील करंजेपूल गावात राहणाऱ्या विवाहितेला हुंड्यासाठी त्रास दिला जात होता. यामध्ये तिचा दीर, सासू, नणंद यांचा समावेश होता. मात्र तिचा पती बँकेत अधिकारी आहे. पण त्याच्याकडून तिला फारसा त्रास नव्हता असे तिने फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान मानसिक आणि शारीरिक त्रास देऊनही ती हुंड्याचे पैसे माहेरावरून आणीत नसल्याने दोन दीर आणि नणंदने तिला भूतबाधा झाली असल्याचा तसेच ती सैतानाचा अवतार असल्याचा प्रचार सुरु केला आणि १५ ऑक्टोबर रोजी एका मांत्रिकाला घरी आणून सर्व पूजा विधीचे साहित्य आणण्यात आले. तसेच एक रिंगण कडून त्या रिंगणात तिला विवस्त्र अवस्थेत बसवण्यात आले. ती ओरडू नये म्हणून तिच्या तोंडात कापसाचा बोला कोंबण्यात आला. यावेळी तिचा पती आणि मुलगा घरात नव्हता. जर या बाबत पतीला काही सांगितले तर तुला ठार मारू अशी धमकी देण्यात आली. विशेष म्हणजे या पूर्वी तिला मारहाण, उपाशी ...पान २ वर

# अनैतिक संबंध त्याला असह्य झाले पत्नीच्या प्रियकराचे तुकडे तुकडे केले



मयत जगदाळे

मुंबई/एस.कुमार

आपल्या पत्नीचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध आहेत हे कुठलाही पुरुष सहन करू शकत नाही आणि आजकाल मोबाईलवरील चॅटिंगमुळे अनैतिक संबंधाचा पटकन सुगावा लागतो. मुंबई पोलीस दलात चालक म्हणून कार्यरत असलेल्या एका पोलिसांच्या पत्नीचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध असल्याची माहिती तिचा पती असलेल्या पोलिसाला मोबाईलमधील चॅटिंगमधून समजली. त्यानंतर त्याने पत्नीच्या प्रियकराला गोड बोलून मुंबईला बोलावले आणि अत्यंत निर्घुणपणे त्याला ठार मारून त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे केले. जनतेच्या सुरक्षेसाठी असलेल्या पोलीस दलातील एखादा पोलीस कर्मचारी इतका हैवान होऊ शकतो. यावर कुणाचाही विश्वास बसणार नाही. मात्र प्रत्यक्षात असे घडले असून आरोपी असलेल्या पोलिसाला त्याच्या पत्नीसह अटक करण्यात आली आहे.

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या न करता तिच्या प्रियकराची हत्या करणाऱ्या आरोपीला आणि त्याच्या पत्नीला मुंबई गुन्हे शाखेच्या पोलिसांनी दहा दिवसांत गजाआड केले. ३० सप्टेंबर रोजी अॅन्टॉपहिल येथील सी.जी.एस. कॉलनी, सेक्टर ०७, बिल्डींग नं ९८ च्या पूर्व भिंतीच्या बाहेरील बाजुस फुटपाथवर, एक ३० ते ४० वर्षे वयोगटातील पुरुष जातीचा मृतदेह पडला असल्याची माहिती अॅन्टॉपहिल पोलिसांना प्राप्त झाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांच्या पाठोपाठ गुन्हे शाखेचे पथकही घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळची पाहणी केली असता, एक ३० ते ४० वर्षे वयोगटातील पुरुष जातीचा मृतदेह दिसून आला. त्या मृतदेहाचे हातपाय तोडलेले होते, त्याला मुंडके नव्हतं तसेच तो अर्धवट जळालेला होता. या वरून सदर इसमाची हत्या करून तो मृतदेह पुरावा नष्ट करण्याचा उद्देशाने जाळून टाकण्याचा प्रयत्न आरोपींनी



केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत होते.पोलिसांनी घटनास्थळचा व मृतदेहाचा पंचनामा करून अॅन्टॉपहिल पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गु.र.क्र. ५९२/२१ कलम ३०२,२०१, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी तो मृतदेह शवविच्छेदना साठी जे .जे. रुग्णालयात रवाना केला. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखाचे पोलीस ...पान २ वर

## घरकाम करणाऱ्या बाईने इशारा केला ड्रग माफिया आगा गजाआड झाला

गुन्हेकथा/लक्ष्मणराव पाटोळे




सध्या मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थाची भारतात तस्करी सुरु आहे आणि या अमली पदार्थाच्या व्यसनामुळे तरुण पिढी बरबाद होत आहे. त्यामुळे सध्या एनसीबीने ड्रग माफियांच्या विरुद्ध मोहीम उघडली आहे आणि या मोहिमेत मोठ्या प्रमाणावर खबरींचा समावेश आहे. पण खबरींच्या माध्यमातून ड्रग माफियापर्यंत पोहचण्याचे हे प्रयत्न आजचे नाहीत तर पूर्वी पासूनचे आहेत. १९८८ मध्ये घरकाम करणाऱ्या एका महिलेच्या खबरी वरून एनसीबीने आग खान नावाच्या ड्रग माफियाला अटक केली होती.

१९८८ सालची ही घटना आहे. अंमली पदार्थाचे विष समाजात पसरू नये यासाठी मुंबई पोलीस प्रयत्नशील होते. पण पुड्या विकणारे छोटे छोटे विक्रेते ताब्यात घेण्यापलिकडे विशेष प्रगती होत नव्हती. अतिरिक्त पोलीस आयुक्त ए.के. अंकोला अस्वस्थ होते. एकेक फांदी छाटण्यापेक्षा थेट मूळावरच घाव घालण्याकडे त्यांचा कल होता. कुछ बडा कर के दिखाओ! ते आपल्या हाताखालील पोलीस अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना सतत सांगत असत. पण बात कुछ बन नहीं रही थी. कारण पोलीस अधिकाऱ्यांचे इतक्या खोलवर नेटवर्क ...पान ६ वर

## रक्ताच्या नात्यातच रक्ताचा सडा पडला जमिनीसाठी भावाने भावाचा मुडदा पाडला



मयत विशाल

लातूर/शंकर सोनवणे

कलयुगातला माणूस इतका स्वार्थी झालाय कि धन संपत्तीच्या लोभापायी त्याला रक्ताच्या नात्याची सुद्धा ओळख राहिलेली नाही. पैसा आणि जमिनीच्या तुकड्यासाठी मुलगा-आई-बापाचा तर भाऊ-भावाचा जीव घेऊन रक्ताच्या नात्याला कलंकित करतोय. लातूर जिल्ह्यातील तांदुळजा गावात अशाच एका घटनेत १८ एकर जमिनीत भावाची हिस्सेदारी राहू नये म्हणून मोठ्या भावाने मित्राच्या मदतीने छोट्या भावाचा खून केला आणि त्याच्या गळ्यात मोठा दगड बांधून मृतदेह मांजरा नदीच्या पत्रात फेकला. रक्ताच्या नात्याला आणि माणुसकीला काळिमा फासणाऱ्या या घटनेने संपूर्ण गाव हादरले असून आरोपी भावाला त्याच्या साथीदारासह पोलिसांनी अटक केली आहे.



आरोपी विपीन

लातूर जिल्ह्यातील मुरूड पोलिस ठाणे हाद्दीतील तांदुळजा या गावातील विशाल उध्दवराव गायकवाड नावाचा २१ वर्षीय तरूण ६ आक्टोबर २०२१ रोजी रात्रीपासून अचनक बेपत्ता झाला होता. तो रात्री नित्यप्रमाणे शेतात झोपण्यासाठी म्हणून गेला होता पण तो सकाळी घरी आला नसल्याने त्याचे आई-वडील चिंताग्रस्त झाले होते. बेपत्ता विशालचा भाऊ विपन याला सकाळी त्याच्या आई-वडीलांनी झोपेतून उठवून विशाल शेतातून घरी आला नसल्याची



माहीती दिली. विपीनने येईल कुठेतरी गेला असल अस सांगून आई-वडीलांची समजूत काढली. सकाळचे दाह वाजून गेले तरी आणखी विशाल शेतातून आला नसल्याने विशालचे ...पान २ वर

## चतुर पोलिसांनी खरोखरच तपास केला चांगला उष्ट्या पत्रावळीवरून दरोडेखोरांचा शोध लागला



चोरीचे घटनास्थळ



एसपी अविनाश



पोनी कोल्हे

अमरावती/क्राईम रिपोर्टर

गुन्हेगार किती जरी हुशार असले तरी पोलीस कधीना कधी त्यांच्यापर्यंत पोहचतात. पोलिसांचा तपास हा सुतावरून स्वर्ग गाठण्यासारखा असतो. त्यामुळे छोट्याशा पुराव्याला तपासाचा धागा बनवून पोलीस आरोपपर्यंत पोहचतात. अमरावतीमध्ये जेवणाच्या उष्ट्या पत्रावळीवरून पोलिसांनी दरोडेखोरांचा शोध घेऊन त्यांच्या मुसक्या आवळल्या. याबद्दल पोलिसांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

आतिश शालिक भोसले या कुख्यात गुन्हेगारास दोन वर्षापुर्वी अमरावती पोलिसांनी एका गुन्ह्यात अटक केली होती. अटकेनंतर त्याची रवानगी कारागृहात झाली होती. कारागृहात विविध गुन्हेगारांचा एकमेकांसोबत ओळख परिचय होत असतो. गुन्हेगारांचा एकमेकांसोबत परिचय होण्याचे व त्यातून पुढील गुन्ह्याचे नियोजन करण्याचे हक्काचे ठिकाण म्हणजे कारागृह असे जनतेत...पान २ वर

## फरारी गुन्हेगाराला पोलिसांनी इंगा दावला भ्रष्टाचारी सरपंच अखेर पाच वर्षांनी गावला



आरोपी खिलचंद

जळगाव/क्राईम रिपोर्टर

भ्रष्टाचार हा माणसाचा आजकाल स्थायी भाव बनलाय. त्यामुळे ग्रामपंचायती पासून राष्ट्रपती भवनापर्यंत जाऊ तिथे खावू याच प्रवृत्तीचे लोक आढळतात. सत्ता हि पैसे खाण्यासाठीच असते असा ज्या लोकांचा समाज आहे अशापैकीच एक होता नशिराबाद ग्रामपंचायतीचा सरपंचखिलचंद दगडू रोटे. भ्रष्टाचारात मुरलेल्या रोटेवर कधी ११ गुन्हे दाखल झाले ते त्यालाही कळले नाही. पण पोलिसांच्या तावडीतून सुटण्यासाठी तो तब्बल पाच वर्ष फरारी होता. मगर कानून के हात बडे लंबे होते है हे त्याला ठाऊक नसावे. पोलिसांनी पाच वर्षांनी का होईना त्याच्या मुसक्या आवळल्या.

कायद्याचे हात एवढे लांब असतात की वर्दीचा कापड देखील कधी कधी कमी पडतो असे म्हटले जाते. वर्दीची सावली लपवून साध्या वेशात गुप्तहेराप्रमाणे जावून आरोपींना पकडण्याचे कसब गुन्हे शोध पथकाच्या अंगी भिनलेले असते. गेल्या पाच वर्षापासून फरार असलेल्या सरपंच आरोपीला शोधून अटक करण्याचे कसब जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या शोध पथकाने दाखवले आहे. खिलचंद दगडू रोटे असे या सरपंच आरोपीचे नाव आहे. जळगाव तालुक्यातील नशिराबाद ग्रामपंचायतीच्या निवडणूकीत खिलचंद दगडू रोटे हा सन २०१५ मधे विजयी झाला होता. ग्रामपंचायत सदस्यत्वाची माळ गळ्यात पडल्यानंतर लवकरच खिलचंदच्या गळ्यात सरपंचपदाची दुसरी माळ देखील पडली.... पान २ वर



## पत्नीला ठार मारून तो तुरुंगात गेला बाहेर येताच तिच्या याराचा खून केला



सोलापूर/क्राईम रिपोर्टर

सुडाने पेटलेला माणूस एखाद्या सैतानासारखा पिसाळलेला असतो. अशावेळी त्याच्या डोक्यात एक वेगळीच सनक असते. त्यामुळे त्याला परिणामाची जराही भीती नसते. म्हणूनच तो कुणाचाही जीव घेऊ शकतो. अशा माणसासाठी एकाला मारले काय आणि दोघांना मारले काय सारखेच असते. सोलापूर जिल्ह्यातील वडापुर इथल्या अमसिध्द पुजारी याचेही तसेच झाले. त्याने त्याच्या पत्नीला तिच्या प्रियकर बरोबर रंगेहात पकडले होते. त्यामुळे त्याने संतापून पत्नीचा खून केला. पण त्यावेळी पत्नीचा प्रियकर पळून गेला होता. पण अमसिध्द याचा त्याच्यावर राग होता. त्यामुळे तुरुंगातून सुटतच त्याने पत्नीच्या प्रियकरालाही ठार मारले आणि पुन्हा तुरुंगात गेला. ...पान ६ वर

## मसाज पार्लरमध्ये जाणे तिघांच्या अंगाशी आले खंडणीसाठी गेले आणि पोलिसांची शिकार झाले

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

माणूस जेंव्हा दुसऱ्याच्या तोंडाला काळे फासण्याचा प्रयत्न करतो तेंव्हा प्रथम त्याचे हात काळे होतात. असाच काहीसा प्रकार कोल्हापूरच्या राजारामपुरी येथे घडला आहे बेकायदेशीरपणे चालणाऱ्या मसाज पार्लरवर धाड टाकण्याची धमकी देऊन त्या पार्लरच्या मालकीनिकडे एक लाखाची खंडणी मागणाऱ्या तिघांना नियतीनेच पोलिसांच्या जाळ्यात अडकवले. कारण मसाज पार्लरची मालकीण पळून जाण्याच्या प्रयत्नात दुसऱ्या माळ्यावरून खाली पडली आणि तिचा मृत्यू झाला. त्यामुळे तिच्या मृत्यूस हे तिघे तरुणच कारणीभूत असल्याचा ठपका ठेऊन त्या महिलेच्या मृत्यू प्रकरणात तिघांवर गुन्हा दाखल करून त्यांना पोलिसांनी अटक केली.



घटनास्थळ



आरोपी शेख



आरोपी कांबळे



आरोपी पोवार

कोल्हापूर शहर आणि परिसरात राजरोसपणे तर काही ठिकाणी छुप्या पध्दतीने मसाज पार्लर सुरू आहेत. या पार्लरमधून बऱ्याच वेळेला मसाजच्या नावखाली वेश्या व्यवसाय चालत असतो. या पार्लरमध्ये गेलेल्या तरूणांना तेथील ललनाकडून शाही मसाज, ...पान ६ वर

## पान १ वरून....

### हुंड्यासाठी सासरच्यांनी तिला ...

ठेवणे यासारखे प्रकार करून तिच्याशी अनैसर्गिक कृत्यही करण्यात आले होते. दरम्यान तिचा नरबळी देण्याच्या उद्देशाने तात्या नावाच्या मांत्रिकाने तिला आपल्या समोर हळद कुंकवाने काढलेल्या रिंगणात नग्न अवस्थेत बसवले. यावेळी तिची सुटकेसाठी धडपड सुरु होती आणि ती रडतही होती आणि तिच्या त्याच रडण्याच्या आवाजाने शेजारी गोळा झाले आणि त्यांनी तिची सुटका केली. त्यानंतर ती माहेरी गेली. दरम्यान या भयंकर घटनेनंतर तब्बल सात ते आठ दिवसांनी म्हणजेच २२ ऑक्टोबर रोजी बारामती पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवण्यात आली आणि बारामती वरून हे प्रकरण वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आले. त्यानंतर पोलिसांनी सदर महिलेची सासू कौशल्य गायकवाड, दीर महेंद्र व राजेंद्र गायकवाड नणंद नीता जाधव आणि मांत्रिक तात्या यांच्या जादू टोना विरोधी कायद्यांन्वये गुन्हा दाखल केला असून हे सर्वजण फरार आहेत. महाराष्ट्र सारख्या सुशिक्षित राज्यात असे गुन्हे घडणे धक्कादायक आहे. आरोपींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी महिलांनी केली आहे.

### जुन्या दुष्मनीने रस्त्यातच घात केला...

का डूख धरून बसलेल्या ग्राहकाने हॉटेलवाल्याला रस्त्यात गाठून साथीदाराच्या मदतीने त्याची निर्घुण हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे. संतोष उर्फ पप्पु श्रीकांत जाधव हा जवाहरनगर गणपती कट्टाजवळ आपल्या कुंटूंबासह राहयला आहे. जवाहरनगर परिसरात संतोष याचे प्रफुल्ल नावाचे हॉटेल असून या हॉटेलात त्याचेकडे दोन तीन कामगार ही कामाला आहेत. संतोष जाधव नावालाच हे हॉटेल चालवित होता. त्याचा या भागात जुगार अड्ड्याचा क्लब ही आहे. त्यामुळे त्याचे या भागातील दोन नंबर धंदेवाल्याशी त्याची अर्थिक नाळ जुळेलेली होती. त्याची उठबस ही त्यातून गुन्हेगारी गँगशी संबंधित असणाऱ्या लोकांत होत होती. गणपती उत्सावात संतोष याच्या हॉटेलात शुभम काणे हा गणेशनगर भागातील तरूण आपल्या मित्रासह जेवायला गेला होता. त्यावेळी जेवण करीत असताना बील देण्याच्या कारणावरून शुभम काणे आणि त्याच्या मित्राचे त्या हॉटेलातील वेटरशी भांडण झाले होते. त्यावेळी झालेल्या वादावादीत संतोष जाधव याने शुभम काणे आणि त्याच्या मित्राला मारहाण केली होती. शुभम काणे हा गणेशनगर परिसरात राहत असल्याने त्याने ही त्यावेळी आपल्या भागातील इतर मित्रांना बोलावून घेऊन परत संतोष जाधव आणि त्याच्या वेटरबरोबर भांडण काढले होते. त्यावेळी तो वाद मिटलेला नव्हता. जर्मन गॅगशी शुभम काणे हा संबंधित असल्याचे सांगून त्याने संतोष जाधव याला डिवचले होते. त्यावेळी दोन्ही गटाकडून शिवाजीनगर पोलीसात परस्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्या होत्या. पोलीसांनी वेळीच हस्तक्षेप करून हा वाद मिटविण्याचा प्रयत्न केला परंतू संतोष जाधव याने ही शुभम काणे याला बघून घेण्याची भाषा केलेली होती. तु कोणाला ही घेवून ये. तुला सोडीत नाही. तुझी गाठ माझ्याशी आहे अशी धमकीच संतोष याने शुभम याला दिलेली होती. दोघे ही गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असल्याने दोघानी ही परस्परांना डिवचले होते. वाद हा वादच असल्याने त्यातून पुढे ठिणगी पेटली होती. तसे पाहाता शुभम पेक्षा संतोष हा सरस होता.तो वयाने आणि अनुभवाने ही मोठा होता. तर त्याचेपुढे शुभम हा तसा क्षुल्लकच होता. तो भाजीपाला विकून आपल्या कुंटूंबाचा उदरनिर्वाह करीत होता. पण संतोषने त्याला बघून घेण्याची भाषा केल्याने तो ही त्याचेवर त्यावेळेपासून डुख ठेवूनच होता. काही झाले तरी या संतोष जाधव याला कायमचा गार करायचा असा त्याने चंग बांधून आपल्या मित्रांना त्याची गेम करायची आहे असे सांगून त्याचेवर पाळत ठेवण्यास सांगितले होते. इचलकरंजी परिसरातील बरेच तरूण हे आठवडयातून एकदा दोनदा बाहेर ओली आणि जेवणाची पार्टी करीत असतात. संतोष याचा काटा काढायचा म्हणून शुभम काणे हा परत शनिवार दि.१६ ऑक्टोंबर रोजी रात्री संतोष जाधव याच्या प्रफुल्ल हॉटेलवर गेला होता. त्यावेळी दारूच्या नशेत असणाऱ्या शुभम काणे याने परत त्याच कामगाराबरोबर किरकोळ कारणातून वाद घालून भांडण उकरून काढले होते. त्याला डिवचत तुझ्या मालकाला बोलव त्याला ही सांगतो असे तो त्या कामगाराला म्हणाला होता. त्याचवेळी नेमके तेथे संतोष जाधव हा आपल्या मित्रासोबत आल्यावर परत तेथे भांडण वाढले होते. त्यावेळी ही झालेल्या भांडणाची तक्रार शिवाजीनगर पोलीसात दोघांनी ही दिली होती.शुभम काणे याचेवर संतोष जाधव यांनी शिवाजीनगर पोलीसात अदखल पात्र गुन्हा दाखल केला होता. संतोष जाधव याचा जुगार अड्डा असल्याने त्याचे पोलीसाशी मधुर संबंध ही होतेच म्हणून तो या प्रकरणी बिनधास्तही होता. रात्री ११ वाजणेच्या सुमारास संतोष जाधव हा आपल्या हॉटेलातून निघून आपल्या तिघा मित्रासोबत डेक्कन परिसरात जमजम नावाच्या हॉटेलात बिर्याणी खाणेसाठी चालला होता. ते मेन रोडवरील हॉटेल सोनाली समोर आले असताना त्याचे मागून शुभम काणे आणि त्याचे मित्र निखल माने, विपुल नाईक, अभिषेक आसाल व त्याचे दोन अल्पवयीन मित्र असे तीन मोटार सायकलीवरून आले. त्यांनी पाठीमागून येवून संतोष जाधव याला आडवून त्याला खाली पाडले. त्याच्याबरोबर असणाऱ्या तिघा मित्रांना त्यांनी आपल्या हातातील तलवारी, कोयता दाखवून तेथून जाण्यास भाग पाडले.त्या सात ते आठ जणाच्या टोळक्याने संतोष याला मारहाण करीत त्याचे अंगावर तलवारीने वार करण्याचा प्रयत्न केला असता तो वार संतोष याने चुकवल्याने तो वार त्याच्या उजव्या हाताच्या मनगटावर बसला त्यासरशी त्याचा मनगटातून हात तुटला. तो खाली रक्ताच्या थारोळ्यात पडल्यावर मारेकऱ्यांनी संतोष याच्यावर तलवार कोयत्याने वार करीत त्याला रक्तबंबाळ केले. संतोष याच्या डोक्यावर,मानेवर,हातावर वार केल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात पडला. भररस्त्यांत संतोष जाधव याचेवर हल्ला झाल्याचे समजताच गणपती कट्टा परिसरातील काही तरूण पळत आणि गाडीवरून हॉटेल सोनाली जवळ आले होते. लोकांची गर्दी ही जमली होती. लोक पळून येत असल्याचे बघून मारेकऱ्यांनी तेथून आपल्या वाहनासह पळ काढला. घटनास्थळी चप्पला, तलवारीची तुटलेली मुठ आणि संतोष जाधव याचा तुटलेला हात पडला होता. संतोष जाधव याचे कडील लोकांनी जखमी असलेल्या संतोष याला लागलीच तेथेच जवळ असणाऱ्या एका हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. परंतु त्याची गंभीर अवस्था बघून तेथील डॉक्टरांनी त्याला आयजीएम हॉस्पिटलमध्ये नेण्यास सांगितले. आयजीएम मध्ये नेल्यावर तेथील डॉक्टरांनी त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितल्याने तेथे जमलेला गणपती कट्टा परिसरातील तरूण वर्ग भडकला. आपल्या माणसाचा खून दुसऱ्या गॅगच्या लोकांनी केल्यचो बघून जमाव ही प्रक्षुब्ध झाला. काही जणांनी तर डेक्कन परिसरातील संशयीत आरोपी शुभम काणे याचे भाजीपाल्याचे दुकान तर फोडलेच. शिवाय त्या भागातील काही दुकनाची मोडतोड ही करून तेथे असणाऱ्या ढकल्ल गाडया ही पेटवून दिल्या.जमाव पेटवा पेटवी करत असताना या घटनेची माहिती शिवाजीनगर आणि शहापूर पोलीसांना देण्यात आली. पोलीस ही या घटनेची माहिती समजताच तातडीने घटनास्थळी दाखल झाले होते. त्यांनी घटनेचा पंचनामा करून या घटनेची माहिती घेतली होती. या घटनेनंतर संतोष जाधव याचेकडील लोकांनी संशयीताच्या घरात घुसून मोडतोड करून मारहाण केली होती.या घटनेची माहिती समजताच पोलीस अधिक्षक मनोज लोहिया पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, पोलीस उपाधिक्षक बाबुराव महामुनी यांनी भेट देवून या घटनेतील संशयीतांना जेरबंद करण्याच्या सुचना पोलीसांना दिल्या. या घटनेतील संशयीताचा शोध घेणेसाठी पोलीसांची चार वेगवेगळी पथके तयार करण्यात आली होती. संशयीत कोण आहेत? याची माहिती पोलीसांना मिळालेली होती. दुसऱ्या दिवशी रविवारी सकाळी ही मयत संतोष जाधव याचे आयजीएम हॉस्पिटलमध्ये पोस्ट मार्टम केल्यानंतर त्याचा मृतदेह अंतिम संस्कारासाठी त्याच्या नातेवाईकाच्या ताब्यात देण्यात आला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना या घटनतील संशयीत शुभम काणे निखिल माने, विपुल नाईक, अभिषक आसाल आणि त्याच्या दोन साथीदारांना जेरबंद करण्यात पोलीसाना यश आले. या घटनेची फिर्याद मयत संतोष जाधव याच्या भावाने शिवाजीनगर पोलीसात दिल्याने संतोष ऊर्फ पप्पु श्रीकांत जाधव (वय ४२) याच्या खून प्रकरणी शुभम काणे, निखिल माने, विपुल नाईक (रा.तिघे ही जवारहर गणेश नगरपरिसर)तर अभिषक आसाल रा.वखार भाग याच्या विरोधात गुन्हा रजि.नं भा.दं.वी.कलम ३०२,१४३, १४७,१४८,१४५,५०४ या कलमासह गुन्हा दाखल करून पोलीसांनी त्यांना इचलकरंजी येथील प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने आठ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेले चाकू, कोयता, तलवारी यासह आदी शस्त्रअस्त्र आणि तिन मोटार सायकली जप्त केल्या. या घटनेचा तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र यादव,रोहन पाटील उदय पाटील, प्रशांत ओतारी, सागर चौगुले यांनी करून घटनेनंतर संशयीत आरोपीना २४ तासात जेरबंद केले. या घटनेनंतर शहरात पुन्हा गॅगवार उफाळून आल्याचे बोलले जात आहे. अशा प्रकारच्या घटनेतून दशहत माजविण्यचाच प्रयत्न केला जातो काही मुठभर गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकाकडून अशा खूनासारख्या गंभीर घटना घडत असल्याने शहरातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणून काढण्याचे आव्हान पोलीस प्रशासनापुढे उभे टाकले आहे. या घटनेतील मयत संतोष जाधव व संशयीत आरोपी हे काही धुतल्या तांदळासारखे स्वच्छ नव्हते.त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याने एखाद्या वादाचे पर्यावसन हे खूनासारख्या गंभीर घटनेत झाले. यातील संशयीत आरोपीनी संतोष जाधव याचा खून कोणत्या कारणातून केला हे कबुल केले नसल्याने गॅगवारशी संबंधीत देखील ही घटना असू शकते, त्यातून हा खून सुपारी देवून ही केल्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. कारण या खूनाशी संबधित एक गुन्हेगार हा गडहिंग्लज येथील गुन्हेगाराशी संबंध ठेवून आहे.त्यामुळे या घटनेचा पुढील तपास शिवाजी नगर पोलीस करीत आहेत.

### अनैतिक संबंध त्याला असह्य झाले...

सह आयुक्त (गुन्हे) मिलिंद भारंबे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) एस. विरेश प्रभु, पोलीस उपआयुक्त प्रकाश जाधव, सहाय्यक पोलीस आयुक्त (डी–मध्ये) नितीन अलकनुरे यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ४ चे प्रभारी पोलीस निरीक्षक इंद्रजित मोरे, सपोनि अजय बिराजदार, स.पो.नि. गव्हाणे, सफौ.राऊत, पो.ह तुकाराम सावंत, उत्तम बोटे, संदिप कांबळे, प्रमोद मोरे, संदिप तळेकर, अजय बल्लाळ, म.पोह.निखाडे, पो.ना. ज्ञानेश्वर मिंडे, पोशि. अनुपम जगताप, सुशिल साळुंखे, श्रद्धानंद होटगीकर, नानाभाउ रोटे, प्रविण चौरे इत्यादी करू लागले. मृतदेहाची ओळख पटेल अशी कुठलीही वस्तू घटनास्थळी मिळून आली नव्हती.त्यामुळे मयत इसम कोण, कुठला? याचा थांगपत्ता नव्हता. मात्र मृतदेहाच्या हातावर दादा हे नाव गोंदवलेले होते. हाच धागा पकडून पोलिसांनी मृत व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न सुरु केले होते. गुन्हे शाखेच्या पथकाने खबरी मार्फत मृत व्यक्तीची ओळख पटवण्यात यश मिळवले. तपासात तो दादा जगदाळे तसेच तो मूळचा सोलापूरचा रहिवाशी असल्याचे उघडकीस आले होते. त्याच्या कॉल रेकॉर्ड तपासले असता तो मुंबई येथील शिवशंकर आणि मोनाली यांच्या संपर्कात असल्याचे गुन्हे शाखेच्या पोलिसांना समजले .पोलीसांची तपासाची चक्रे फिरू लागली. तपासात शिवशंकर हा मुंबई पोलीस दलात पोलीस नाईक म्हणून कार्यरत असून सध्या त्याची पोस्टिंग ऍण्टॉप हिल विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्ताकडे आहे. तिथेच तो चालक म्हणून कामाला आहे अशी माहिती गुन्हे शाखेच्या पोलीसांना प्राप्त झाली. गुन्हे शाखेच्या पथकाने शिवशंकरला चौकशीसाठी बोलावले. गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणून त्याची कसून चौकशी केली असता त्याने फार आढेवेढे न घेता गुन्ह्याची कबुली दिली ती अशी! शिवशंकर गायकवाड व त्याची पत्नी मोनाली गायकवाड हे दोघे पती–पत्नी वरळी येथे राहत होते. तो त्याच्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला नेहमी मारहाण करीत होता. पतीकडून होणाऱ्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून ती तिच्या माहेरी निघून गेली होती. गेल्या दिड वर्षापासून ती तिच्या माहेरी सोलापूर ला राहत होती. अलीकडेच ती मुंबई वरळीच्या घरी आली होती. मात्र घरी आल्यानंतरही शिवशंकर हा तिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. तिचे कुठल्या पुरुषाशी अनैतिक संबंध आहे असे त्याला वाटत होते. याच दरम्यान त्याने तिचे दादा जगदाळे (४५) सोबतचे काही मॅसेज वाचले होते. या मॅसेजनंतर तो प्रचंड संतापला होता. त्यातूनच त्याने दादाच्या हत्येची योजना बनविली होती. त्याने त्याला फोन करुन मुंबईला बोलावून घेतले. मुंबईत आल्यानंतर दादाची हत्या करुन मृतदेहाचे तुकडे केले. मृतदेहाची ओळख पटू नये म्हणून त्याने त्याचे अवयव एका गोणीत भरले. हा प्रकार नंतर त्याच्या पत्नीला समजताच ती प्रचंड घाबरली. त्याच्या सांगण्यावरुन तिने हत्येचा पुरावा नष्ट करण्यास त्याला मदत केली होती. घटनास्थळी गोणी आणल्यानंतर त्याने पेट्रोल टाकून हत्येचा पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. कोणालाही संशय येऊ नये म्हणून तो नियमित कामावर येत होता. त्याचे मुंडके गोणीत नव्हते, ते मुंडके त्याने कुठे टाकले याचा आता पोलीस तपास करीत आहेत. मोबाईल रेकॉर्डवरुन हत्येचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना यश आले आहे. तपासात शिवशंकर आणि मोनालीचा सहभाग उघडकीस येताच त्यांना पोलिसांनी १० आक्टोबर रोजी अटक करून सुट्टीचे न्यायालय हजर केले असता त्याना १४ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. अशा प्रकारे दहा दिवसांपूर्वी अँटॉप हिल येथे सहाय्यक पोलीस आयुक्त कार्यालयाजवळ सापडलेल्या मुंडके नसलेल्या मृतदेहाचे गुढ उकलण्यात अखेर गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना यश आले आहे. शिवशंकर गायकवाड व त्याची पत्नी मोनाली गायकवाड या दोघांना गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे.

### रक्ताच्या नात्यातच रक्ताचा सडा...

वडील उध्दवराव गायकवाड काळजी करू लागली. त्यांनी आपला मोठ मुलगा विपीनला शेतात जावून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे विपीन लगबगीने शेतकडे गेला काही तासातच तो घरी परतला. विशाल शेतात नसलयाची माहीती विपीनने आपल्या आई–वडीलांना दिली. विशाल गायकवाड याच्या नातेवाईकांनी विशालचा शोध घघेण्यास सुरूवात केली. तांदूळजा गावातील चौकात जावून विशालचे जवळचे मित्रांना विशाल दिसला का? भेटला का? याची चौकशी केली पण विशाला सकाळपासून कोणालाच दिसला आथवा भेटला नसल्याचे दिसून आले. दुपार झाली तरी विशाल घरी आला नसल्याने तो कुठेतरी नातेवाईकांकडे गेला असावा अस समजून गायकवाड कुटूंब काही काळ शांत राहीले. विशाल वापरत आसलेला मोबाईल पण बंद येत आसल्याने सगळ्यांच्या मनात शंकेचे पाल चुकचुकू लागली. आतिवृष्ठीमुळे विद्युत पुरवठ खंडीत झाल्याने बहूतेक त्याचा मोबाईल बंद आसवा असा अंदाज बांधुन सर्वजण धिराची भुमिका बजावत होते. दरम्यान आक्टोबर महीन्यात झालेल्या मुसळधार पावासमुळे मांजर नदीचा पाणी विर्सग कॅनल, नादी नाल्याने सोडल्याने सर्वच शिवार पाण्याने तुडंब भरलेली होती. जशी जशी रात्र होऊ लागली तसं गायकवाड कुटुंब कुटुंबियांचा काळजाचा ठोका चुकू लागला. प्रत्येकाच्या मनात नाना विचार येऊ लागले. तर्कवितर्कांना उधाण आले. विशाल गायकवाड नेमका कुठे असावा आणि कुठे गेला असावा याबाबत चर्चा सुरू झाली. गायकवाड कुटुंबीयांनी आपल्या सर्वच नातेवाईकांना मोबाईलवरून संपर्क साधून विशाल तिकडे आला का याची चौकशी केली. मात्र कुठल्याच नातेवाइकाकडून विशाल सुखरूप असल्याची वा इकडे आल्याची वार्ता दिली नाही. गायकवाड कुटुंब जमल तस विशालचा शोध घेत होते. मात्र विशाल बद्दल कुठलीच ठोस माहिती गायकवाड कुटुंबीयांना मिळत नव्हती. एरवी कुठेही बाहेर जाताना धरी सांगून जाणारा विशाल आज अचानक बेपत्ता झाल्याने त्यांच्या चिंतेत भर पडली होती. रात्र उलटून गेली दुसऱ्या दिवशी सकाळी विशाल मिळून येत नसल्यामुळे उद्धव गायकवाड व त्यांचा मोठा मुलगा विपिन गायकवाड यांनी मुरुड पोलीस ठाणे गाठले.तांदुळजा येथील शेतकरी उद्धवराव गायकवाड व त्यांचा मोठा मुलगा विपीन गायकवाड हे दोघेजण मुरुड पोलीस स्टेशनला आले. विपीन गायकवाउ यांने त्याचा छोटा भाऊ विशाल गायकवाड हा गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी उद्धवराव गायकवाड व त्यांच्या मोठ्या मूलाकडून बेपत्ता विशालची अधिक माहिती जाणून घेतली. पोलिसांनी उद्धव गायकवाड यांच्याकडून बेपत्ता तरुणांचे वर्णन आणि फोटो घेतला. संबंधित तरूणाचा रंग, उंची त्याने अंगात घातलेले कपडे याचे संपूर्ण वर्णन पोलिसांनी घेतले. डायरीला मिसींगची नोद करून मुरूड पोलिसांनी तपासाला सुरूवात केली. सुरूवातीला मुरूड पोलिसांनी बेपत्ता तरूणाची प्राथमिक माहीती जाणून घेण्यासाठी तांदुळजा गाव गाठून आधिक माहीती जाणून घेतला असता तांदुळजा येथील मूळ रहिवासी असलेले उद्धवराव गायकवाड हे आपली पत्नी दोन मुलासह तांदुळजा येथे वास्तव्यास होते अतिशय कष्टातून कमावलेल्या १८ एकर शेतीमध्ये शेत जमीन करून ती आपला उदरनिर्वाह चालवत होते. त्यांना बिपीन आणि विशाल अशी दोन मुले होती. मोठा मुलगा विपिन हा महाविद्यालयीन शिक्षणानंतर घरीच राहात होता. तर त्याचा छोटा भाऊ विशाल हा महाविद्यालयीन महाविद्यालयीन शिक्षणासाठी शिराळा येथे जात होता. तांदूळजा या गावात उद्धवराव गायकवाड एक मनमिळावू कष्टाळू आणि प्रामाणिक व्यक्ती असल्याची ख्याती होती. एक सधन शेतकरी म्हणून गायकवाड कुटूंबाकडे पाहील जात होत. उध्दवराव गायकवाड यांचे दोन्ही मूल अविवाहीत होते.घरी चारचाकी वहान,चांगले घर असा सुखी परीवार होता. त्यांची कोणाशी वैर अगर दुश्मानी नव्हती. एक चांगल माणूस म्हणून गायकवाड यांच्याकडे पाहील जात होत. एवढी माहीती पोलिसांनी हास्तगत केली. दरम्यान विशाल बेपत्ता झाला त्या दिवशी रात्री विपीन गायकवाड याचा मित्र रात्री गावात विशाल सोबत शेताकडे जाताना दिसला आसल्याची गुप्त माही पोलिसांनी मिळवली. चार दिवस उलटूनही विशाल गायकवाड याच शोध लागत नस्ल्याने पोलिसही हातबल झाले. वरचेवर बेपत्ता विशाल गायकवाड याच्या नातेवाईकांनी मुरूड पोलिस ठाण्यात चकरा मारण्यास सुरू करून विशालचा शोध घेण्याची विनंती सुरू केली. पाच–साहा दिवस उलटूनही बेपत्ता तरूणाची काहीच खबर लागत नसल्याने मुरूड पोलिस ठाण्याचे साहाय्यक पोलिस निरीक्षक धनंजय ढोणे यांनी पोलिस कर्मचाऱ्यांना योग्य त्या सुचना करून तपास करण्यास सांगितले. बेपत्ता तरूणाच्या प्रत्येक दिवसाची दैनंदिनी याचा आभ्यास करून तपासाची दिशा ठरविली. त्यांचे शेवटचे लोकेशन याची माहीती मागवली. पोलिस कर्मचाऱ्यांनी मिळवलेली माहीती व तंत्रीक बाबींचा सपुर्ण आभ्यास सपोनि धनंजय ढोणे यांनी करण्यास सुरूवात केली. चाणक्ष नजर आसलेल्या सपोनि धनंजय ढोणे यांच्या मनाता संशयाची पाल चुकचुकली.विशालचा घातपात झाला असावा असा प्राथमिक अंदाज सपोनि धनंजय ढोणे यांनी आपल्या पोलिस कर्मचाऱ्यांकडे बोलून दाखवला. तंत्रीक बाबी अधारे सपोनि धनंजय ढोणे यांनी विशालच्या मित्रांची चौकशी करण्यास सुरूवात केली. दरम्यान विशालचा मोठा भाऊ विपीन याचाही माहीती काढली. बहूदा विचारपूस करताना विपीन गायकवाडा हा आपल्या भावाबद्दलची वाईट माहीती पोलिसांना देत आसल्याची बाब सपोनि धनंजय ढोणे यांना खटकली.तसेच तो पोलिसांच्या नजरेला नजर मिळवत नसल्याचेही दिसून आले. कुठेतरी घरातच पाणी मुरतय असा दाट संशय सपोनि ढोणे यांच्या मनात घर करू लागला. ६ आक्टोबर २०२१ रात्री विपीनचा मित्र विकास व्यंकटराव ढाणे हा विशाल सोबत शेतात झोपायला गेला होता या माहीतीला दुजोरा मिळाला. पोलिसांनी विपीनच्या मित्राला बोलावून अधिक माहीती जाणून घेतली असता त्याच्याकडून असमाधान कारे उत्तरे मिळाली. विपीन गायकवाड आपल्यापासून काहीतरी लपवत आसल्याची खात्री पोलिसांना झाली. विपीन गायकवाड याला विचापूस करण्यासाठी मुरूड पोलिसांनी बोलावून घेतले. त्याकडे तांत्रीक बाबी अधारे अधिक चौकशी केली असता तो भाबावून गेला. त्याला विश्वासात घेवून विचापूस केली असता त्यांनी पोलिसा समोर एक भयनक सत्य सांगून वडिलांची १८ एकर शेती स्वतःलाच मिळावी या हव्यासापोटी मित्राच्या मदतीने आपल्या लहान भावाचा खून करून त्याला नदीपात्रा दगड बांधून फेकून दिल्याचे कबूल केले. यावरून पोलिसांनी विपीन गायकवाड याचा मित्र विकास ढाणे याला तांदूळजा गावापसून जवळच आसलेल्या रांजणी गावातून उचलले. त्याला पोलिसात हजर करून अधिक विचारपूस केली असता दोघांनही सांगण्यास सुरूवात केली. अठरा एकर शेतीसाठी दुसरा वाटेकरू नको म्हणून विपीनने आपला जिवलग मित्र विकास ढाणे याला वारंवार विशाल वाईट नादाला लागला आहे. तो सगळी बरबादी करल अस सुचवून त्याचा कायमचा काटा काढण्याचो बोलून दाखविले. त्याला विकासने मदत करण्याचे आश्वासन दिले. ६ आक्टोबर रोजी रात्री विकास ढाणे राजणी गावातून तांदूळजा येथे आला. त्यादिवशी रात्री विशाल नेहमीप्रमाणे शेतात झोपण्यासाठी निघाला. विशाल सोबत मीपणी शेतात जातो असा आग्रह विकासने केला. त्यामुळे विशाल आणी विकास दोझेजण शेतात गेले. विशालचा आज गेम होणार आहे याचा साधा थांगपत्ता विशालला लागला नाही. शंतात गेल्यावर विकास आणी विशालने इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्या. साधारण ११ वाजण्याच्या सुमारास विशाल गाढ झोपी गेला. दरम्यान विकास झोपीचे सोंग घेवून जागीच होता.दरम्यान विपीनने त्याला फोन करून विशालची माहीती घेतली. विशाल गाढ झोपीत आसल्याचे कळताच पिवीपने आपली आल्टो ककंपीची कार काढून शेताची वाट धरली. शेतात जाताच विपीनने गाढ झोपीत असालेल्या आपल्या लहान भावाच्या डोक्यात काठीने जोरात कार केले. वार वर्मी लागल्याने एक किंचाळी ठेकून विशाल थंड झाला. विशाल मेल्याची खात्री होताख विपीन आणी विकासनक त्याला उचलून गाडीत टाकले. त्याचे हात पाय दोरीने बांधून त्याच्या प्रेताला मोठा दगछ बांधून ते प्रेत बोरगाव पूलावरून मांजरा नदी पात्रात टाकले. मयताचे वडील उद्धवराव गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुरुड पोलीस ठाण्यात कलमगुरंन २७८/२१ कलम ३०२ २०१ ३६४ ३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. जिल्हा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, पोलीस अप्पर अधीक्षक जैन ,लातूर ग्रामीण उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाचे सर्व सूत्र मुरुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक साईनाथ ढोणे यांच्या हाती देण्यात आले. तपासाची चक्रे गतिमान करत गुन्ह्याची उकल होताच मुरुड पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय मुंडे यांच्या समोर मोठा प्रश्न उभा राहिला नदीपात्रातून मृतदेह शोधण्याचा परवाच्या पुरामुळे नदी पात्रात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे नदीपात्रात निर्माण झालेली दलदल आणि मोठ्या प्रमाणात सुरू असलेला पाण्याचा प्रवाह यामुळे शोधकार्यात अडथळे येत होते अखेर बाबळगाव येथील पोलीस मुख्यालयातून आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या पथकाला पाचारण करण्यात आले. या पथकाने बोटीच्या माध्यमातून मंगळवारी दिवसभर शोध मोहीम राबविली असता संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास आडीज किलोमीटर अंतरावर नदीपात्रातील एका झुडपात अडकलेला विशालचा मृतदेह आढळून आला. सकाळी तांदुळजा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात सभेचे धन केल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. ही कामगिरी पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे अप्पर पोलीस अधीक्षक अनुराग जैन उपविभागीय पोलिस अधिकारी जितेंद्र जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे, पोलीस उपनिरीक्षक सुर्वे, विष्णू चौगुले, पोलीस हेड कॉन्स्टेबल राजाभाऊ खोत, विठ्ठल साठे, बहादूर, सहाय्यक पोलीस निरीक्षक सय्यद, बाबासाहेब खोपे, महेश पवार, चालक नागनाथ जांभळे यांनी परिश्रम घेतले पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे करीत आहेत

### चतुर पोलिसांनी खरोखरच तपास केला...

म्हटले जाते. आतिश भोसले कारागृहात असतांना अमरावती जिल्ह्यातील एका दरोड्यातील सहा गुन्हेगारांचे आगमन तेथे झाले. त्या सहा दरोडेखोरांसोबत आतिशचा परिचय झाला होता. एकाच विचाराने व धेय्याने झपाटलेले आणि समान विचारधारेचे गुन्हेगार जमल्यानंतर त्यांच्या मनाची तार जुळून येण्यास वेळ लागत नाही. कारागृहात जवळपास बहुतेक गुन्हेगार एकाच विचारधारेचे असतात. त्यामुळे त्यांच्यात ओळख होण्यास व पुढील गुन्ह्याचे नियोजन करण्यास त्यांना जणूकाही हक्काची जागा मिळालेली असते. कारागृहाच्या माध्यमातून आतिश शालिक भोसले (३५), रा. तिवसा याची अंकुश तारासिंग चव्हाण (२५) व शिलीपसिंग चंदुलाल पवार (३६), दोघेही रा. काळाघोटा, ता. तिवसा यांच्यासोबत मैत्री झाली होती. काळ पुढे सरकल्यानंतर त्यांची कारागृहातून सुटका देखील झाली. १ ऑक्टोबर २०२१ रोजी आतिशच्या काळा घोटा येथील एका नातेवाईकांच्या घरी जेवणाचा कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमात आतिशप्रमाणेच अंकुश व शिलीपसिंग यांना देखील आमंत्रण होते. एकाच विचाराचे तिघे मित्र एकाच कार्यक्रमात भेटल्यानंतर साहजीकच त्यांच्यात दरोड्याच्या व्यवसायाची चर्चा सुरु झाली. या भेटीत अंकुश याने एका दरोड्याचे नियोजन आतिश व शिलीपसिंग यांच्यासमोर उघड केले. अमरावती जिल्ह्यातील मारडा येथील व्यावसायिक निलेश साव यांच्या व्यवसायाची व भक्कम आर्थिक स्थितीची माहिती अंकुशने आतिश व शिलीपसिंग या दोघांना दिली. निलेश साव यांच्या मारडा येथील निवासस्थानी दरोडा टाकण्याचे नियोजन तिघांनी त्याच कार्यक्रमात केले. लवकरच त्याला मुर्त स्वरुप देण्याचे देखील तिघांनी ठरवले. निलेश साव यांच्या मारडा येथील निवासस्थानी मोठ्या प्रमाणात सोने चांदीचे दागिने व रोकड मिळणार असल्याची तिघांची खात्री झाली. त्यामुळे त्यांनी याकामी मनुष्यबळ वाढवण्याचे देखील नियोजन केले. आतिशने जिल्ह्याबाहेरील दरोडेखोरांशी संपर्क, भेटीगाठी आणि त्यांना दरोड्यासाठी आमंत्रण देण्याचे काम सुरु केले. लवकरच दरोड्याच्या नियोजनाला गती देण्यात आली. याकामी जिल्ह्याबाहेरील काही दरोडेखोरांनी भाड्याचे वाहन करुन ३ ऑक्टोबर रोजी अमरावती शहर गाठले. त्याच दिवशी आतिश, अंकुश, शिलीपसिंग व जिल्ह्याबाहेरील गुन्हेगार अशा सर्वांची दरोड्याच्या पुर्वसंध्येला एक बैठक पार पडली. त्याच रात्री आठ वाजेच्या सुमारास निलेश साव यांच्या मारडा येथील घराची पाहणी अर्थात रेकी करण्यात आली. नियोजनाचा एक भाग म्हणून काही सहका–यांना जंगलात थांबवून ठेवण्यात आले. जिल्ह्याबाहेरील मुख्य सुत्रधाराने जंगलातील साथीदारांसह सर्वासाठी एका ढाब्यावरुन जेवणाचे पार्सल खरेदी केले. दरोडा टाकण्यापुर्वी सर्वानी जंगलातच जेवण आटोपले. भरपेट जेवण केल्यानंतर ठरल्यानुसार ४ ऑक्टोबरच्या मध्यरात्री दरोडा टाकण्यासाठी निलेश साव यांच्या निवासस्थानाकडे मार्डा गावी कुच करण्यात आले. नियोजन केल्यानुसार सर्व दरोडेखोरांनी निलेश साव यांच्या निवासस्थानी सशस्त्र दरोडा टाकण्याचे काम फत्ते केले. या सशस्त्र दरोड्यात निलेश साव यांच्याकडील ४०३ ग्रॅम वजनाचे दागिने, ८०० ग्रॅम वजनाची चांदी व साडेतीन लाख रुपयांची रोकड असा एकुण १३ लाख ८९ हजार ५०० रुपये किमतीचा ऐवज जबरीने घेत सर्व दरोडेखोरांनी सुर्योदयापुर्वीच जिल्ह्याबाहेर पलायन देखील केले. त्यानंतर सकाळी याप्रकरणी कुऱ्हा पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा गु.र.न. २४९/२१ भा.द.वि. ३९५ नुसार दाखल करण्यात आला. दरोड्याची घटना उघडकीस आल्यानंतर अमरावती ग्रामीण पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांनी स्वत: घटनास्थळी धाव घेत बारकाईने पाहणी केली. सीसीटीव्ही अथवा घटनास्थळावर दरोडेखोर कोण, कुठले याचा कुठलाही मागमुस लागत नव्हता. तसा कुठलाही पुरावा दिसून येत नव्हता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. तपन कोल्हे यांच्याकडे सोपवण्यात आला. पो.नि. तपन कोल्हे व त्यांच्या सहका–यांनी या गुन्ह्याचा पुढील तपास सुरु केला. तपासादरम्यान पोलिस पथकाला घटनास्थळापासून नजीकच्या जंगलात उष्ट्या पत्रावळ्या, द्रोण व जमीनीवर सांडलेला भात आढळून आला. सांडलेला भात, उष्ट्या पत्रावळ्या व द्रोण यांचा या दरोड्याशी काहीतरी संबंध असावा अशी शंकेची पाल पो.नि. तपन कोल्हे यांच्या मनात चुकचुकली. त्या आधारे तपास लागू शकतो असा विचार पो.नि. तपन कोल्हे यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने सुरु केला. एकाचवेळी सहा ते सात जणांचे जेवणाचे पार्सल ढाब्यावरुन घटनेच्या आदल्या रात्री कुणी नेले होते का याचा तपास सुरु करण्यात आला. परिसरातील एका ढाब्यावर पोलिस पथकाला पुसटशी माहिती मिळाली मात्र त्याठिकाणी जेवणासोबत पत्रावळी अथवा द्रोण दिले जात नसल्याची माहिती देखील मिळाली. मात्र त्या ढाब्यासमोर असलेल्या एका पान टपरीवर तशा पत्रावळ्या व द्रोण विक्री केले जात असल्याची माहिती देखील पुढे आली. जंगलात मिळून आलेल्या पत्रावळ्या व द्रोण या पान टपरीवरील पत्रावळी व द्रोणसोबत मिळत्याजुळत्या होत्या. ढाब्यावरील भात देखील ढाब्यावरील भाताशी मिळताजुळता आढळून आला. त्यामुळे दरोडेखोरांपैकी कुणीतरी याच ढाब्यावरुन जेवण घेत पान टपरीवरुन पत्रावळी व द्रोण घेतले असावे असा अंदाज लावण्यात आला. पुढील तपासाच्या टप्प्यात पोलिस पथकाने संबधित ढाबा व पान टपरी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. ३ ऑक्टोबरच्या रात्री साडे आठ ते नऊच्या सुमारास आतिष, अंकुश व एक असे तिघे जण जेवणाचे पार्सल घेण्यासाठी आले असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्यांना ओळखले होते. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दरोडेखोर कोण हे जवळपास निश्चीत झाले होते. तपासाला आता गती मिळाली. पोलिसांनी तातडीने आतिशचा शोध सुरु केला. संशयाच्या बळावर पोलिस पथकाने आतिश यास शोधून काढले. आतिश शालिक भोसले पोलिसांच्या हाती लागल्यानंतर त्याचे दोघे साथीदार अंकुश तारासिंग चव्हाण व शिलीपसिंग चंदुलाल पवार हे देखील ९ ऑक्टोबर रोजी शिताफीने पकडण्यात आले. तिघे पोलिसांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगार आहेत. अटकेतील तिघांनी दिलेल्या कबुलीमुळे त्यांच्या अजून सहा साथीदारांची नावे उघड झाली. मात्र ते फरार असल्याने पोलिस पथक त्यांच्या मागावर असून लवकरच त्यांना जेरबंद केले जाणार असल्याचे पो.नि. तपन कोल्हे यांनी म्हटले आहे. अमरावती ग्रामीण पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधीक्षक शशिकांत सातव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक तपन कोल्हे व त्यांचे सहकारी स.पो.नि. गोपाल उपाध्याय, पोलिस उप निरीक्षक मंगेश भोयर, आशिष चौधरी, सुरज सुसतकर, तस्लीम शेख, सहायक फौजदार मुलचंद्र भांबुरकर, संतोष मुंदाने, अनिल वासनिक, त्र्यंबक मनोहरे, अक्षय हरणे, दिपक उईके, प्रशांत ढोके, दिपक सोनोळेकर, सचिन मिश्रा, शकिल चव्हाण, मंगेश लकडे, युवराज मानमोठे, दिनेश कनोजिया, प्रविण अंबाडकर यांनी या गुन्ह्याच्या तपासात सहभाग घेतला. फरार मुख्य आरोपींचा तपास सुरु आहे.

### फरारी गुन्हेगाराला पोलिसांनी इंगा...

बी. ई. सिव्हिल पदवीप्राप्त खिलचंदच्या हाती ग्रामपंचायतीची सत्ता आली होती. सत्तारुढ खिलचंद यास भ्रष्टाचाराची लागण होण्यास वेळ लागला नाही. भ्रष्टाचार व अपहार कसा करायचा हे सांगणारे व सल्ला देणारे त्याला भेटू लागले. कमिशन, टक्केवारी, एका सहीची किंमत या गोष्टी त्याने आत्मसात केल्या. ग्रामपंचायतीच्या शौचालय बांधण्याच्या निधीत खिलचंद याने अपहार केला. अपहारानंतर त्याच्यावर आरोप होण्यास सुरुवात झाली. त्यानंतर चेक अनादर होण्याचे प्रमाण देखील वाढले. बघता बघता भा.द.वि. १३८ च्या त्याच्यावर अकरा गुन्हे दाखल झाले. आपल्यावर होत असलेले अपहाराचे आरोप, दाखल होत असलेले गुन्हे बघता तो फरार होण्यात यशस्वी झाला. सन २०१७ पासून फरार झालेला खिलचंद कुणाच्याही हाती लागत नव्हता. तो कुणाला साध्या डोळ्यांनी दिसेनासा झाला. नशिराबाद पोलिस स्टेशनचे तत्कालीन अधिकाऱ्यांनी सन २०१७ मधे तपास सुरु केला होता. मात्र फरार खिलचंदचा तपास लागत नसल्यामुळे तो तपास हळूहळू थंड बस्त्यात पडला. पाच वर्ष झाले तरी खिलचंदचा थांगपत्ता कुठेही लागत नव्हता. दरम्यानच्या कालावधीत खिलचंद याने विविध गावांना नोकरी पत्करुन आपला चरितार्थ भागवला. बी.ई. सिव्हील पर्यत शिक्षण झाले असल्यामुळे खिलचंद यास पटकन कुठेही नोकरी मिळून जात होती. नाशिकला एका कंपनीत त्याने दोन वर्ष काम केले. मात्र त्याठिकाणी नंतर त्याला पोलिस विभागाचा चारित्र पडताळणी दाखला मागण्यात आला. आपल्यावर गुन्हे दाखल असल्यामुळे चारिद्र्य पडताळणीच्या फंदात न पडण्यात त्याने धन्यता मानली. त्यानंतर त्याने नाशिक सोडले. ठाणे व कल्याण आदी ठिकाणी त्याने जॉब केला. मात्र तो कुठेही एका जागी जास्त दिवस थांबला नाही. त्याच्यावर दाखल असलेले अकरा गुन्हे हे त्यामागचे मुख्य कारण होते. बघता बघता पाच वर्षाचा कालावधी उलटला. आता आपल्याला पोलिस पकडणार नाही याची त्याला खात्री पटू लागली होती. पोलिस पथकाला तो सापडत नव्हता. कित्येकदा पोलिस पथक रिकाम्या हाती परत येत होते. मात्र जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. किरणकुमार बकाले यांनी या गुन्ह्याचा बारकाईने व थंड डोक्याने अभ्यास केला. पाच वर्षापासून फरार खिलचंद यास पकडण्याचा विडा त्यांनी उचलला. कधी खबऱ्यांकडून तर कधी आपले नेटवर्क वापरुन त्यांनी फरार खिलचंदचा माग काढण्याचा प्रयत्न सुरु केला. मात्र या कालावधीत खिलचंद निर्धास्त झालेला होता. आता आपल्याला पोलिस पकडू शकत नाही अशी त्याची मानसिकता व खात्री झाली होती. मात्र जळगाव स्थानिक गुन्हे शाखेची यंत्रणा डोळ्यात तेल घालून जागीच होती. खिलचंद कल्याण ते ठाणे अप डाऊन करत असल्याची एक पुसटशी माहिती पो.नि. किरणकुमार बकाले यांना समजली. त्या अंधुक माहितीच्या आधारे त्यांनी आपले सहकारी पो.हे.कॉ.जितेंद्र पाटील, अकरम शेख, नितीन बाविस्कर, संदीप सावळे या चौघांना मोहिमेवर रवाना केले. फरार आरोपी खिलचंद हा मुंबई, कल्याण व ठाणे परिसरात रहात असल्याची कच्ची बातमी नंतर पक्की झाली. आता याच परिसरातून गाफील खिलचंद यास ताब्यात घ्यायचे हे तपास पथकातील चौघांनी ठरवले. दहा ते बारा दिवस ते त्याच्या पाळतीवर राहू लागले.

कुठलाही मागमुस नसतांना केवळ पारंपारिक माहितीच्या तपासावर त्याचा शोध सुरु होता. अखेर पोलिस पथकाकडे असलेले वर्णन एका कल्याण–ठाणे अप डाऊन करणाऱ्या व्यक्तीसोबत जुळून आले. ती व्यक्ती खिलचंद हाच असल्याची तपास पथकाची पक्की खात्री झाली. त्याला ताब्यात घेतल्यानंतर सुरुवातीला तो आपली ओळख लपवू लागला. मात्र जितेंद्र पाटील, अकरम शेख व नितीन बाविस्कर यांच्या कडेकोट बंदोबस्तातील हालचाली त्याच्या लक्षात आल्या. त्याने आपला गुन्हा व ओळख कबुल करण्यापुर्वी एक प्रश्न विचारला. दादा... तुम्ही माझ्यापर्यत आलेच कसे? गेल्या पाच वर्षात पोलिस माझा तपास करु शकले नाही. मी माझे आयुष्य ओळख लपवत जगत असतांना तुम्हाला माझा शोध लागलाच कसा? असा प्रश्न त्याने पथकातील चौघांना केला. खिलचंद यास ताब्यात घेत अटक करण्यात आली. तहान भुक, झोप, अंघोळ या घटकांचा त्याग करणाऱ्या तपास पथकातील चौघा पोलिस सहकाऱ्यांनी खिलचंद यास पो.नि. किरणकुमार बकाले यांच्यासमोर हजर केले. ग्रामपंचायत शौचालयाच्या रकमेत अपहार करुन गेल्या पाच वर्षापासून फरार असलेल्या व आता पोलिसांच्या ताब्यातील खिलचंदने आपला गुन्हा कबुल केला. अटकेतील खिलचंद यास मुलबाळ नसल्याचे समजते. तो फरार कालावधीत तो कुठेही एका जागी स्थिर राहिला नाही. एका गावाहून दुसऱ्या गावाला तो भरकटत राहिला. मात्र अखेर तो स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाच्या हाती लागलाच. त्याच्य विरुद्ध नशिराबाद पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. ३७/१७ नुसार गुन्हा दाखल आहे.

क्राईम संध्या
सोमवार दि. २५ ऑक्टोंबर २०२१ ते रविवार दि. ३१ ऑक्टोंबर २०२१
लातूर/पालघर/सोलापूर
www.crimesandhya.com


# शाश्वत भरघोस उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी स्मार्ट शेती करावी -गौतम देसर्डा

## जैन इरिगेशन व गजानन ठिबकतर्फे जळके येथे पीक परिसंवाद संपन्न

**जळगाव/प्रतिनिधी**

शाश्वत शेती उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी पीक पर्याय शोधावे, आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारावे, कमी खर्चात जास्त उत्पादन घ्यावे, भविष्यात येणाऱ्या काळात स्मार्ट शेती करणें अत्यावश्यक आहे. बाजारपेठेत ग्राहकांची मागणी याचा अभ्यास करणे ही क्रमप्राप्त आहे असे आवाहन करार शेती विभागाचे प्रमुख गौतम देसर्डा यांनी जळके येथील पीक परिसंवाद केले. जैन इरिगेशन सिस्टीम, श्री गजानन ठिबक सिंचन जळके यांच्या संयुक्तविद्यमाने करार शेती व व्यवस्थापन याबाबत पीक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. पूर्व मशागत, पांढरा कांदा, मिरची, टोमॅटो रोपांची लागवड पाणी व्यवस्थापन, संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, फर्टिगेशन, कीड-रोग व्यवस्थापन याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर डॉ अनिल ढाके, गौतम देसर्डा, पोक्रा योजनेचे समन्वयक संजय पवार, तालुका कृषी अधिकारी श्रीकांत झांबरे, कृषी पर्यवेक्षक शरद पाटील, जिल्हा परिषद सदस्य पवन सोनवणे, प्रताप पाटील, पंचायत समिती कृषी अधिकारी सौ. प्रतीक्षा सोनवणे, जैन इरिगेशनचे विभागीय व्यवस्थापक डी. एम. बऱ्हाटे, श्रीराम पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

**पाण्याचे व खतांचे काटेकोर नियोजन आवश्यक- डी.एम.बऱ्हाटे**

पिकांची अवस्था, जमिनीच्या पोत आणि आवश्यकता नुसार पाणी व खतांचे काटेकोरपणे नियोजन आवश्यक आहे. अत्याधुनिक सिंचनाचे स्वयंचलित ऑटोमेशन पद्धतीने पाणी व खताचे



नियोजन करता येते. पाणी मोजून पिकांच्या गरजेनुसार शेतकरी टाईम बेस, व्हॉल्युम बेस व सेन्सॉर बेस अशा तीन पद्धतीने उत्तम नियोजन करणे सहज शक्य होते. वायरलेस टेक्नॉलॉजी वापरून बसल्या जागी नियोजन शेतकरी करू शकतात याबाबत जैन इरिगेशनचे विभागीय व्यवस्थापक डी. एम. बऱ्हाटे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

**मिरची, टोमॅटोकडे शेतकऱ्यांनी वळावे -डॉ.अनिल ढाके**

जैन इरिगेशनने शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान दिले. कांदा रोप पेरणीस मजूर मिळत नसल्याने बैल संचलित कांदा पेरणी यंत्र उपलब्ध केले. आता मातीविरहीत (प्लग लागवड पद्धती) कपात तीन ते चार रोपे लावले जातात हे तंत्र शेतकऱ्यांना लवकरच उपलब्ध होईल. यामुळे कांदा रोपांची संख्या योग्य राखण्यास मदत होईल. यापुढील अत्याधुनिक पद्धत ट्रान्सप्लांटर मशीन म्हणजे कांदा रोपांची लड पद्धतीने लावणी करता येते. कंपनीने या मशीनच्या यशस्वी चाचण्या घेतल्या आहेत अशी माहिती डॉ ढाके यांनी दिली. शेतकऱ्यांनी कांद्यासोबतच टोमॅटो व मिरचीची देखील लागवड करावी. जैन कंपनीने मसाले उत्पादन सुरू केले असल्याने मिरचीची मोठ्याप्रमाणावर आवश्यकता असते शेतकऱ्यांनी हळद, आले, मिरचीचे ही उत्पादन घ्यावे. शेतकऱ्यांनी यांत्रिक बाबीचा उपयोग करून गादी वाफापद्धतीने रोपांची लागवड करावी. बुरशीजन्य रोग व किडीच्या व्यवस्थापनासाठी नियोजन करावे. गादी वाफावर मिरची, टोमॅटो ची लागवड करावी कारण जांभळा, काळा करपा, बुरशी रोग यांपासून बचाव करता येऊ शकतो. शेतकऱ्यांनी टोमॅटो, मिरची लागवड करावी असे मार्गदर्शन डॉ. ढाके यांनी केले. करार शेती व शेती व्यवस्थापन याबाबत जैन इरिगेशनचे पांढरा कांदा करार शेती विभागाचे सहकारी श्रीराम पाटील यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. कांदा खरीप व रब्बी पध्दतीने पेरणी होते. कांद्याची मशीनद्वारे पेरणी करावी. रोपवाटिका करण्याची आवश्यकता नसल्याने एक महिना इतका वेळ वाचविता येतो. पर्यायाने परिश्रम, वेळ व मजुरी वाचविता येते. कांदा लागवड करून शेतकऱ्यांनी शाश्वत उत्पादन घ्यावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. पंचायत समिती कृषी विभागाच्या कृषिअधिकारी सौ. प्रतीक्षा सोनवणे यांनी अनुसूचित जाती जमातीसाठी नवीन विहीर अनुदान योजनांची सविस्तर माहिती दिली. पाईप, ठिबक, शेततळे इत्यादी बाबतही माहिती सांगितली. कृषी विभागाचे पोक्रा योजनेचे समन्वयक संजय पवार यांनी देखील शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती दिली. बांबू लागवड करून आपल्या उत्पन्नात वाढ करावी. पारंपरिक शेतीसोबत तुती लागवड, रेशीम किडे संगोपन याबाबत पोकरा प्रकल्पात सहभागी होऊन आपले उत्पन्न शेतकरी मिळवू शकतात असे सोदाहरण उदाहरण त्यांनी माहिती दिली. राष्ट्रीय महिला शेतकरी दिनाच्या औचित्याने जळके- विटनेर पंचक्रोशीतील महिला शेतकऱ्यांचा प्रतिनिधिक सत्कार करण्यात आला. कुसुमबाई परदेशी, सरला प्रल्हाद पाटील, वंदना चंद्रकांत पाटील, सीताबाई सपकाळे, वसंतवाडीच्या महिला सरपंच यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांढरा कांदा करार शेतीचे सहकारी सोळंकी यांनी केले. श्री गजानन ठिबकचे संचालक पी. के. पाटील यांनी आभार मानले. कोरोना काळात दिवंगत झालेल्या व्यक्तींना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कोरोना आव्हानात्मक काळात जैन इरिगेशनचे सार्वजनिक कार्यक्रम बंद होते. हा शेतकऱ्यांसाठी आयोजलेल्या कार्यक्रमात परिसरातील स्त्री व पुरुष शेतकरी आवर्जून उपस्थित होते.

# शेटफळ जवळ गोवा बनावटीचा २६ लाखांचा मद्यसाठा जप्त



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

राज्य उत्पादन शुल्कच्या सोलापूर विभागाने शेटफळ ते कुर्डूवाडी रस्त्यावर शेटफळ चौकलगत शिवप्रसाद हॉटेल समोर चार आरोपींना ताब्यात घेऊन जेरबंद केले. त्यांच्याकडून वाहने व गोवा बनावटीचा २६ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. विलास मोराळे, कृष्णा मुजमुले, गणेश जाधव आणि मिलिंद मगरे अशी अटक करण्यात आलेल्या चार आरोपींची नावे आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पथकाने शेटफळ ते कुर्डूवाडी रस्त्यावर चौकालगत हॉटेल शिवप्रसाद समोर एकूण चार आरोपींना ताब्यात घेतले आहे. या आरोपीकडून एक आयशर टेम्पो, स्विफ्ट कार सह १९० बॉक्स गोवा बनावटीचा अवैद्य मध्ये साठा असा एकूण २६ लाख २० हजार ३२० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आरोपीवर महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९च्या कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधीक्षक नितीन धार्मिक, उपअधीक्षक नितीन आदित्य पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य उत्पादन शुल्क व विभागाने प्रभारी निरीक्षक अंकुश अवताडे, भरारी पथकाने प्रभारी निरीक्षक सुदर्शन संकपाळ, दुय्यम निरीक्षक सुनील पाटील, सहाय्यक दुय्यम निरीक्षक झगडे कर्मचारी गजानन होळकर, अण्णा कर्चे, प्रकाश सावंत, चेतन व्हनगुंटी आदींनी ही कारवाई बजावली आहे.

# विविध मागण्यांसाठी श्रमजीवी संघटनेचा मूकमोर्चा



**वाडा/प्रतिनिधी**

तालुक्यातील खरीवली येथील रास्त भाव दुकानदार येथील लाभार्थ्यांना जाती वाजत शिवीगाळ करत आहे, चांबळे येथील दुकानदाराला तांदूळ चोरून विकत असताना पकडले होते तर गौरपूर येथील रास्तभाव दुकानदार लाभार्थ्यांना केरोसीन देत नसल्याची तक्रार केली होती तरीही पुरवठा अधिकाऱ्यांनी त्या दुकानदारांवर कारवाई केली नाही. म्हणून बुधवारी वाड्यातील पुरवठा विभागाच्या कार्यालयावर तोंडाला काळ्या फिती बांधून मूक मोर्चा काढण्यात आला. प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला धान्य मिळावे, धान्यपासून कोणीही वंचित राहू नये, रेशनकार्ड मिळाले पाहिजे, केरोसीन मिळाले पाहिजे या मागणी करितापालघर जिल्हा महिला प्रमुख सरिता जाधव, पालघर जिल्हा शेतकरी घटक उपप्रमुख किशोर भाऊ मढवी, तालुका अध्यक्ष जानू मोहनकर, भरत जाधव, माजी तालुका अध्यक्ष मिलिंद थुले, उपाध्यक्ष सुरेश पऱ्हाड, संपर्क प्रमुख रफीक चौधरी, महिला प्रमुख प्रमिला तरसे, घटक प्रमुख चंदर गवते, सचिव सुरज दळवी, विभागीय सचिव बाळाराम पाडोसा, रेखा पऱ्हाड व इतर तालुका पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मूक मोर्चा काढण्यात आला.

# भारताचे राष्ट्रपती आणि राज्याचे मुख्यमंत्री यांना श्रमिक हक्क अभियानाचे विविध मागण्याचे निवेदन



**देवणी/प्रतिनिधी**

केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्रा यांचा मुलगा आशिष मिश्रा यांच्या गाडीचे ताफाने दिनांक ३.१०.२०२१ रोजी शेतकरी आंदोलन करताना यांनी बारा पेक्षा जास्त शेतकऱ्यांना भर रस्त्यात गाडी खाली चिरडून ठार मारले. आशीष मिश्रा विरुद्ध कलम ३०२ प्रमाणे हत्येचा गुन्हा दाखल करून कडक कारवाई करावी व केंद्रीय ग्रह राज्यमंत्री अजय मिश्रा यांचा राजीनामा घ्यावा, अशा आशयाचे निवेदन तहसीलदार देवणी मार्फत श्रमिक हक्क अभियान महाराष्ट्र सलग्न मानवी हक्क अभियानच्या वतीने महामहीम राष्ट्रपती यांना दिले आहे. थोडक्यात असे की उत्तर प्रदेशातील लखिमपुर खीरी शहरातील मंत्र्याच्या मुलाचा मोटार कारच्या धडकेतून निरपराध शेतकऱ्यांना चिरडून मारणयात यशस्वी झाला. याप्रकरणी प्रधानमंत्री मंत्री नरेंद्र मोदी अमित शहा मौन धारण केले. उत्तर प्रदेश सरकार बरखास्त करून राष्ट्रपती राजवट लागू करावी. तीन कृषी काळे कायदे व कामगारावर अन्याय करणार्या चार कामगार संहिता रद्द करावे. अतिवृष्टी धारक शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये द्यावे व कष्टकरी हातावर पोट असणाऱ्यांना सरसगट दरडोई १५ हजार रुपये द्यावे. पंचनामे राजकीय स्टंट घोषणाबाजी भरपूर झाले तात्काळ मदत करावी. अशा विविध मागणी श्रमीक हक्क अभियाना कडून तहसीलदार देवणी मार्फत महामहीम राष्ट्रपती, प्रधान मंत्री, कृषी मंत्री, गृहमंत्री, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा मा. सोनियाजी गांधी, राष्ट्रीय मानवी हक्क आयोग नवी दिल्ली, उपमुख्यमंत्री, महसूलमंत्री, विरोधी पक्षनेता, विधान परिषद विरोधी पक्ष नेता, बांधकाम राज्यमंत्री यांना निवेदन दिलेले असून या निवेदनावर श्रमीक हक्क अभियानचे राष्ट्रीय डायरेक्टर ज्ञानेश्वर भाऊ सूर्यवंशी, कायदेविषयक सल्लागार ॲड.जे.बी भाले, जिल्हा अध्यक्ष दशरथ कांबळे सल्लागार पांडुरंग कदम, भारत मुक्ती मोर्चा जि.उपाध्यक्ष मुजीब तांबोळी, मुजीब शेख बहुजन मुक्ती पार्टी तालुकाध्यक्ष अध्यक्ष, कष्टकरी संघटना जिल्हा सचिव हूसेन धोत्रे, काँग्रेस कार्यकर्ते अविनाश कांबळे, विद्या प्रसाद शिंदे, भीम पतंगे, परमेश्वर होळकर, बालिका होळकर यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# येत्या २६ ऑक्टोंबरला औसा येथे पारंपारीक आग्गी सोहळ्याचे आयोन

**औसा/प्रतिनिधी**

औसा येथील श्री विरभद्रेश्वर मंदिरात सामूहिक आग्गी सोहळा दिनांक २६ अक्टोंबर २०२१ मंगळवार रोजी संपन्न होत आहे. या सोहळ्यासाठी भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आग्गी सोहळ्याचे पाचवे पिढीचे पुरंत श्री रामलिंग सातलिंग स्वामी यांनी केले आहे. औसा येथे स्वातंत्र्यपूर्व कालखंडापासून परंपरे नुसार चाललेल्या सामूहिक आग्गी सोहळ्यास पाचव्या पीढिची परंपरा चालू आहे. याची सुरुवात ईरय्या स्वामी या पुरंत स्वामींनी केले. यांचा वसा पुढे कायम ठेवण्याचे काम मृगय्या स्वामी, बसय्या स्वामी, सातगिंगय्या स्वामी व सद्या रामलिंगय्या स्वामी हे करीत आहेत. या आग्गी सोहळ्याच्या पालखीची मिरवणूक विरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष सुभाषप्पा मुक्ता यांचे प्रमुख उपस्थितीत सर्व समाज बांधव व भक्तगण रामलिंग स्वामी यांचे अधिपत्याखाली सायंकाळी सात वाजता श्री विरभद्रेश्वर मंदिराकडे निघणार आहे. श्री विरभद्रेश्वरांच्या आग्गी सोहळ्यात प्रतीवर्षाप्रमाणे याहीवर्षी रामलिंग स्वामी यांच्या निवासस्थानी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या महाप्रसादाचा लाभ समाज बांधव व भक्तगणांनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आवाहन रामलिंग स्वामी यांनी केले आहे.

## आम. संजयभाऊ राठोड यांचा लातूर जिल्हा दौरा



**लातूर** : वसई, पालघर, ठाणे, मुंबई, परभणी, जालना, नंदुरबार, धुळे, औरंगाबाद, जळगाव, सोलापूर,नाशिक व उस्मानाबाद जिल्हा दौऱ्यानंतर आता पुढील दौरा लातूर जिल्ह्यातील उदगीर-जळकोट व लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच ओबीसी समाजातील कार्यकर्त्यांसोबत आरक्षण,पदोन्नती मधील आरक्षण नॉन-क्रिमिलेयर, सामाजिक, राजकीय तसेच विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी बंजारा सामाजाचा बुलंद आवाज लोकनेते माननीय माजी कॅबिनेट मंत्री आमदार संजयभाऊ राठोड येत आहेत. दौऱ्यादरम्यान या महाराष्ट्र जनसंपर्क दौऱ्याचे संयोजक व समन्वयक चित्रपट निर्माता-दिग्दर्शक व समाजसेवक प्रा.चंद्रकांत काळुराम पवार तसेच ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे प्रमुख पदाधिकारी, शंकर पवार, राजू नाईक, डॉ. टी.सी.राठोड याशिवाय लातूर जिल्ह्यातील बंजारा समाजातील सामाजिक कार्यकर्त्यांसह राजकीय नेतेही सोबत राहणार आहेत.

# रासपाच्या वतीने ग्रामीण रुग्णालयास टाळे ठोको अंदोलन करणार

**दांडी बहाद्दर डॉक्टर निळकंठ सगर यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी**

**देवणी/शकिल मनियार**

देवणी येथे ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा मिळुण दशक लोटले तरी अद्यापपर्यंत ग्रामीण रुग्णालयाच्या दर्जाप्रमाणे विविध सुविधेचा अभाव जाणवत आहेत व तसेच येथील रुग्णालयाचे अधीक्षक दांडी बहाद्दर डॉक्टर निळकंठ सगर यांना तात्काळ निलंबित करून दुसरे अधीक्षक नेमण्यात यावे डॉक्टर सगर गेल्या सहा महिन्यापासून चार वेळा ही उपस्थित राहले नाहीत व तसेच रुगणालयाचा स्टॉप ही कमी आहे म्हणून इथल्या ग्रामीण रुग्णालयाच्या अधिक्षक व स्टॉप मुळे शहरातील व देवणी तालुक्यातील जनतेला नाहक त्रास होत असून त्यामुळे ग्रामीण रुग्णालयात विवीध सुविधेचा अभाव जाणवत असून हे रुग्णाच्या जीवाशी बेतले जात आहे यात प्रामुख्याने ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक चार आठवड्यात एक वेळा सुधा येत नसल्यामुळे व महिन्यातून एक वेळा यायचं बाकीच्या कर्मचाऱ्यांना धाकधूक करायचे सह्या करून पगारी उचलायचे स्वतःचे प्राव्हेट हॉस्पिटल निलंगा येथे चालवत आहेत. डॉ. सगर यांच्या त्रासाला कंटाळून गेल्या सहा महिन्यांपासून वारंवार देवणी शहरातील व तालुक्यातील जनतेने अनेक वेळा निवेदने देऊन सुद्धा या भ्रष्ट व दांडीबहाद्दर डॉक्टर सागर यांच्यावर आद्याप कार्यवाही करण्यात आली नाही म्हणून शहर व तालुक्याच्या वाशीयांच्या वतीने देवणी शहर व तालुक्यातील नागरिकांना विविध आडचणीना तोंड द्यावे लागत आहे म्हणून दि २६/१०/२०२१ तारखेला ग्रामीण रुग्णालयास ताला ठोको आंदोलन करण्यात येणार आहे अशी वरील सर्व माहिती राष्ट्रीय समाज पक्षाचे मराठवाडा संपर्क प्रमुख अनंद जिवणे यांनी तहसिलदारांना दिलेल्या निवेदन म्हणले आहे

## थोडक्यात वृत्तांत

### जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर : जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी जीवन देसाई यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये लातूर जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत दि. १६ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते दि. ३१ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश धार्मिक सभा, अंत्ययात्रा, विवाह, अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

### गोंदिया येथील नाटयगृहासाठी सुधारीत प्रस्ताव

मुंबई : गोंदिया येथे नाटयगृह बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून या नाटयगृहाबाबतचा सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात यावा असे सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांनी सांगितले. गोंदिया येथील नाटयगृहासंदर्भात बैठक आज मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला माजी आमदार गोपालदास अग्रवाल, सांस्कृतिक कार्य विभागाचे उपसचिव विलास थोरात, यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. श्री.देशमुख म्हणाले की, गोंदिया येथे अद्ययावत नाटयगृह बांधण्यात येत असून या नाटयगृहासाठी सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात यावा. सुधारीत प्रस्ताव तयार करीत असताना मंजूर अनुदानाबरोरबच आवश्यक असलेले अनुदान याबाबतचीही माहिती सादर करण्यात यावी.

### कुस्ती मार्गदर्शकांच्या नियुक्तीसाठी आवाहन

लातूर : भारत सरकार क्रीडा विभाग यांनी खेळाच्या विकासाकरीता सर्व राज्यात विविध जिल्ह्यात विविध खेळांचे प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यासा मंजूरी दिली आहे. या प्रशिक्षणातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू निर्माण होतील. या उद्देशाने 'खेलो इंडिया' कुस्ती प्रशिक्षण केंद्र लातूर या ठिकाणी मान्यता देण्यात आली आहे. त्या करीता मानधन तत्वावर कुस्ती मार्गदर्शक नियुक्ती करावयाचे आहे. मार्गदर्शकाची पात्रता पूढील प्रमाणे आहे. ऑलिम्पींक , एशियन गेम्स, जागतिक अजिंक्यपद, अधिकृत स्पर्धा सहभाग, पदक, प्राप्त आणि प्रशिक्षणाचा अनुभवासह जागतिक करंडक स्पर्धा, एशियन चेम्पियनशिप ,साऊथ एशियन स्पर्धा, संबंधित खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा सहभाग, पदक प्राप्त खेळाडु- प्रशिक्षणाच्या अनुभवासह राष्ट्रीय किंवा राज्य पुरस्कारार्थी प्रशिक्षणाच्या अनुभवासह एन.आय.एस. पदविका किंवा संबधीत खेळाचे अधिकृत लेवल कोर्सेस किंवा बी.पी.एड. एम.पी.एड, राष्ट्रीय स्पर्धा पदक प्राप्त किंवा नॅशलन गेम्स पदक प्राप्त- प्रशिक्षणाच्या अनुभवासह राज्यस्तर खेळाडू बी.पी.एड, एम.पी.एड. दहा वर्षाचा प्रशिक्षणाचा अनुभव, प्रशिक्षकाचे वय १८ ते ४५ वर्ष, अशा पात्रता धारकांनी आपले अर्ज, शैक्षणिक पात्रता व खेळाच्या प्रमाणपत्रासह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात २९ ऑक्टोबर २०२१ कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी लातूर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### रेणुकादेवी मंदिर तीर्थक्षेत्राचा विकासची मागणी

लातूर : लातूर व शेजारच्या जिल्ह्यांसह सीमावर्ती भागातील भक्तांचे श्रद्धास्थान असणाऱ्या रेणापूर येथील रेणुकादेवी मंदिर तीर्थक्षेत्राचा विकास करावा, अशी मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी राज्याचे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सचिन दाने यांच्यासह शिष्टमंडळाने सह्याद्री अतिथीगृहावर आदित्य ठाकरे यांची भेट घेऊन हे निवेदन सादर केले. यावेळी माजीमंत्री सचिन अहिर, शिवसेनेचे लोणावळ्याचे नगरसेवक मराठे यांचीही उपस्थिती होती. रेणापूर येथे रेणुका देवीचे मोठे मंदिर आहे.एक जागृत देवस्थान म्हणून रेणापुरची ख्याती आहे.विविध बांधकाम शैलींचा नमुना असणाऱ्या या मंदिरात हलणारी दीपमाळ आहे. सुमारे ३५ फूट उंचीची ही इमारत पूर्णपणे हलते. याशिवाय या परिसरात अनेक पुरातन वास्तु आहेत. त्यामुळे तीर्थक्षेत्र विकास तसेच पुरातन वास्तू संशोधन करण्यासाठी अभ्यास गट नेमावा. पर्यटन विकास अंतर्गत निधी उपलब्ध करून द्यावा. तालुक्यातील शेतकऱ्यांना पीकविमा मिळवून द्यावा, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. यासंदर्भात लवकरच अभ्यास गट नेमून संशोधनाचे कार्य सुरू करण्यात येईल, असे आश्वासन आदित्य ठाकरे यांनी या शिष्टमंडळाला दिले. यावेळी लातूर तालुका प्रमुख ॲड.प्रविण मगर, चेतन होळकर, रणझुंजार प्रतिष्ठानचे धनंजय भिसे, शिवप्रतापसिंह कोळी, ॲड. शिवयोगी चपने, अंगद सोमवंशी, अभय मराठे यांचीही उपस्थिती होती. कलाकार राजेश कुलकर्णी यांच्याकडून तयार करून घेतलेले पेंटिंग यावेळी आदित्य ठाकरे यांना भेट देण्यात आले.

### महाराष्ट्र भटके-विमुक्त हक्क परिषदेच्या जिल्हा सहसचिव पदी दत्तात्रय सुर्यवंशी

लातूर : जिल्ह्यातील भटके - विमुक्त समाजासाठी करीत असलेले निस्वार्थ कार्य, उल्लेखनीय सामाजिक व वंचित उपेक्षित समाजाच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी हक्क परिषदेने उभारलेल्या लढ्यात सक्रिय सहभाग घेऊन महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात कार्यरत अव्वल कारकून दत्तात्रय रतनराव सुर्यवंशी यांची भटके- विमुक्त हक्क परिषदेचे जिल्हाध्यक्ष राजेश भांडे यांनी नुकतीच लातूर जिल्हा सहसचिव पदी निवड झाल्याबद्दल लातूर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रागंणात नियुक्तीपत्र दिले. श्री.सूर्यवंशी यांची नियुक्ती पुढील तीन वर्षा साठी असून या काळात ते भटके - विमुक्त हक्क परिषदेच्या ध्येय व धोरणानुसार संघटनेच्या विस्तारासाठी व बांधणीसाठी धडाडीने समाजकार्य करतील.,अशी अपेक्षा व्यक्त करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी जिल्हाध्यक्ष राजेश भांडे, जिल्हा संघटक दिपक वाडेकर, दत्तात्रय सूर्यवंशी, श्रीनिवास काळे, विलास बडगे, बबनराव काळे आदि उपस्थित होते.

# १०० कोटींचा टप्पा!

कोरोना महामारीने संपूर्ण जगाला हादरवून टाकले होते. या भयानक रोगाने जगातील चार कोटीहून अधिक लोकांचा बळी घेतला होता. आश्चर्याची गोष्ट म्हणजे विज्ञानाच्या जोरावर चंद्रावर पाऊल ठेवणारा आणि अंतराळात अनेक विक्रम करणाऱ्या पृथ्वीवरील शास्त्रज्ञांना कोरोनावरची लस शोधायला काही महिन्यांचा कालावधी लागला आणि शेवटी जानेवारी २०२१मध्ये कोरोना प्रतिबंधक लस उपलब्ध झाली. तेव्हा कुठे जगाने सुटकेचा निःश्वास टाकला. कारण जगात वेगाने लसीकरण सुरू झाले. भारतात फेब्रुवारीमध्ये लसीकरण सुरू झाले. पुण्यातील सिरम इंन्टयूटने बनवलेल्या कोव्हीशिल्ड आणि कोव्हाक्सिन सारख्या लसी भारतीयांसाठी संजीवनी ठरल्या. लसीच्या डोसची उपयुक्तता आणि आवश्यकता पाहता भारत सरकारने संपूर्ण देशात मोफत लसीकरण मोहीम सुरू केली आणि तेंव्हापासून लसीकरण हे भारतीयांसाठी एक मोठे संजीवनी मिशन बनले आहे. कारण या लसीकरणामुळेच कोरोना नियंत्रणात आला आणि त्यातून कोट्यवधी लोकांना आपला जीव वाचवण्याची एकप्रकारे हमीच सरकारकडून मिळाली. काल या लसीकरणाच्या मोहिमेने १०० कोटींचा टप्पा गाठला. मात्र अजून हि मोहीम पूर्ण झालेले नाही. कारण टार्गेट १३५ कोटी आहे. ज्यावेळेस १३५ कोटी भारतीय लसीचे दोन्ही डोस घेऊन आपल्या शरिराभोवती सुरक्षा कवच उभे करतील तेंव्हाच खऱ्या अर्थाने ही मोहीम सफल होईल. मात्र लसीकरणाच्या या मोहिमेद्वारे आम्ही कोरोना विरोधाची ही लढाई शंभर टक्के जिंकू असा प्रत्येक भारतीयाला विश्वास आहे. म्हणूनच ही मोहीम बऱ्यापैकी यशस्वी झाली आहे. ही मोहीम यशस्वी करण्यात सरकार, प्रशासन, मेडिकल स्टाफ, सामाजिक संस्था आदी सर्वाचेच मोठे योगदान आहे. आणि जेंव्हा येवढे सगळे लोक एकत्र येवून एखादी मोहीम हाती घेतात तेंव्हा ती हमखास यशस्वी होते. मात्र ती यशस्वी करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करावी लागते. भारतात लस बनवण्यासाठी संशोधन करण्यापासून ते त्या लसीचा जागतिक आरोग्य संघटनेचे मान्यता घेण्यापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर सरकारला खूप प्रयत्न करावे लागले. त्यानंतर १३५ कोटी लोकांना मोफत लस देण्याचे टार्गेट पूर्ण करण्यासाठी जे सर्व पातळीवरून प्रयत्न सुरू आहेत त्याचे कौतुक करावे तितके थोडे म्हणावे लागेल. कारण काही राज्यांच्या ग्रामीण भागात या लसीकरणाच्या बाबत तिथल्या लोकांमधे भीती आणि अंध श्रद्धा होती. लस घेतल्यावर माणूस मरतो, माणूस वेडा होतो इथपासून ते लस घेतल्यावर देवाचा कोप होईल इथपर्यंत लोकांच्या मनात भीती होती. मात्र ही भीती दूर करण्यासाठी सामाजिक संघटना स्थानिक लोकप्रतिनिधी स्थानिक स्वराज्य संस्था पुढे आल्या, त्यांनी कुठे कलेच्या तर कुठे प्रबोधनाच्या माध्यमातून लोकांच्या मनातली भीती दूर केली, तेंव्हा कुठे ग्रामीण दुर्गम भागातील लोक लस घ्यायला तयार झाले. लसीकरणाच्या मोहिमेत केवळ एवढेच अडथळे नव्हते तर देशाच्या पूर्वोत्तर भागातील भौगोलिक परिस्थितीने लसीकरण मोहिमेत अनेक अडथळे आणले. अरुणाचल प्रदेश, उतराखंड, झारखंड, मणिपूर, मेघालय आणि पश्चिम बंगाल मधील डोंगराळ भाग या भागात पोहचण्यासाठी प्रवासाची फारशी साधने नसतानाही लसीकरण मोहीम राबविणाऱ्यांनी कुठे पाच पाच किमी चालत, कुठे घोड्यावर बसून, तर कुठे पुल नसलेल्या नदी-नाल्यातील कमर भर पाण्यातून पैलतीर गाठून तिथल्या दुर्गम गावात लसीकरण केले. काही भाग तर इतके दुर्गम होते की तिथे ड्रोनच्या मदतीने लसीचा साठा पोहचवावा लागला. आमच्या कोरोना योद्धांनी गेले सात आठ महिने अनेक हाल अपेष्टा सोसून ही तारेवरची कसरत पार करीत १०० कोटींचा टप्पा गाठला. आता सरकार समोर आणखी एक मोठे आव्हान आहे आणि ते म्हणजे लहान मुलांच्या लसीकरणाची दोन ते आठ वयोगटातील मुलांचे लसीकरण करताना खूप काळजी घ्यावी लागणार आहे, त्यांच्या पालकांची समजूत घालण्यापासून ते मुलाना सुरक्षित लस देण्यापर्यंत एक मोठी जबाबदारी आहे. कारण लहान मुलांना काही आजार असतात. त्याचबरोबर त्यांची प्रकृती त्यांच्या शरीरातील रोग प्रतिकारक शक्ती या सगळ्या गोष्टींचा विचार करूनच केंद्र सरकारने याबाबतची नियमावली तयार केली आहे. त्यामुळे लहान मुलांना लस देण्याची मोहीम सुद्धा निश्चितपणे यशस्वी होऊन १३५ कोटींचे टार्गेट पूर्ण करता येईल असा सर्वानाच विश्वास आहे. केंद्रातील मोदी सरकार बाबत काही लोकांमध्ये काही पक्षामध्ये भलेही मतभेद असेल तरी लसीकरण मोहीम खूपच चांगल्या पद्धतीने त्यांनी यशस्वी केली आणि त्याला देशातील सर्व राज्यांनी चांगली साथ दिली याबाबत कुणाचेही दुमत नाही.

# गर्दुल्यांची राजकीय पाठराखण



**संध्या स्ट्रोक**
**सोनू जाधव**

कोणतेही सरकार हे जरी लोकनियुक्त असेल तरी सरकारचा सर्व कारभार प्रशासनाकडून चालवला जातो. त्यामुळे सरकारमधील मंत्री आमदार आणि प्रशासनातील अधिकारी यांनी एकमेकांचा आदर करायला हवा. कारण शेवटी दोघेही जनतेसाठी काम करीत असतात. जनतेचे सेवक असतात आणि त्या दोघांनी जर परस्परातील समन्वय ठेऊन काम केले नाही, तर त्यांच्यातील वीसंवादाचा सरकारच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि नेमकी हीच गोष्ट सरकार मधील काही मुजोर लोकप्रतिनिधींना कळत नाही. सध्या आर्यन खान याचे जे ड्रग प्रकरण सुरू आहे त्यात एनसीबीवर सरकार मधील एक मंत्री बेछूट आरोप करीत आहेत. सरकारी यंत्रणा राज्यकर्त्यांच्या दबावाखाली काम करतात हे जरी खरे असले तरी सरकारी अधिकारी हे आपल्या घरातले नोकर नाहीत. ते आपल्या प्रमाणेच जनतेचे सेवक आहेत याचे सरकार मधील मंत्र्या संत्र्याना भान हवे, खास करून पोलीस, सीबीआय, ईडी, आयबी, एसीबी, एनसीबी यासारख्या तपास यंत्रणांची जबाबदारी खूप मोठी असते. अशावेळी एखाद्याने त्यांच्या तपासाबाबत संशय घेणे, त्यांच्या तपास कामात अडथळे आणणे योग्य नाही. कारण अशा दबाव तंत्रामुळे त्यांचे खच्चीकरण होते आणि त्याचा परिणाम त्यांच्या कामावर होतो. परंतु काही वर्षापासून तपास यंत्रणा असोत किंवा निवडणूक आयोगा सारख्या स्वयात संस्था असोत. आजकाल या सर्व सरकारी संस्था पुढाऱ्यांच्या दबावाखाली काम करीत असतात. पुढारी सांगतील तसं त्यांना वागावं लागत अन्यथा बदली किंवा निलंबनाची भीती असते. अशावेळी मग नाईलाजाने का होईना पुढारी सांगतील तसे वागावे लागते. मात्र काही अधिकारी बेडर असतात, ते कुणाचेही ऐकत नाहीत, मग त्यांना राजकीय पुढारी टार्गेट करतात. सध्या एनसीबीचे झोनल डायरेक्टर समीर वानखेडे यांच्या बाबतीत सुद्धा असेच झालेले आहे. ड्रग हे एक भयानक विष आहे आणि परदेशातून ते भारतात पाठवून भारतातील तरुण पिढीला बरबाद करण्याचे भारताच्या शत्रूंचे प्रयत्न सुरू आहेत. त्याला कुठेतरी आळा घालण्याचे काम एनसीबी अर्थात अमली पदार्थ विरोधी शाखा काम करीत आहे. गोव्याकडे निघालेल्या क्रूझवर एनसीबीने धाड टाकून रेव्ह पार्टी मधल्या श्रीमंतांच्या बिघडलेल्या गर्दुल्ले मुलांना पकडले. त्यात शाहरुख खानचा गर्दुल्ला पोरगाही होता, त्याच्यावर अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई केली हा त्यांचा गुन्हा झाला काय? आणि या कारवाईत जसा शाहरूख खानचा मुलगा होता त्याच प्रमाणे काही हिंदू मुलेही होती.

त्यामुळे या कारवाई कडे धर्माच्या चष्म्यातून का पाहिले जाते तेच कळत नाही, पण एका नेत्याने जो मंत्री म्हणजेच लोक प्रतिनिधी आहे अशा माणसाने एनसीबीच्या अधिकाऱ्यांना तुरुंगात टाकायची भाषा करणे, त्याच्यावर आणि त्याच्या कुटुंबिया वर बेछूट आरोप करणे केवळ चुकीचेच नाही तर पूर्णपणे बेजबाबदार पणाचे आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी अशा मंत्र्याला योग्य ती समज द्यायला हवी. कारण असे प्रकार जर घडत गेले, तर तपास यंत्रणामध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना काम करणे अवघड जाईल. त्या मंत्र्याला हे कळायला हवे की आज ड्रगमुळे देशातील किती तरुण बरबाद झालेत.

त्यात हिंदूही आहेत आणि मुसलमानही आहेत. अशावेळी सेलिब्रिटींच्या बिघडलेल्या पोरासाठी ड्रग विरुद्ध मोहीम उघडलेल्या एनसीबी सारख्या तपास यंत्रणेला बदनाम करून त्यांचे खच्चीकरण करणे चुकीचे आहे, त्यामुळेच कुठेतरी थांबायला हवे.

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

अमृत महोत्सव विशेष लेख

# स्वातंत्र्य संग्रामात पालघर जिल्ह्याचे योगदान

भारताचा स्वातंत्र्य लढा ज्याला म्हणता येईल तो १९४७ साली संपला. संपला म्हणजे तेव्हाच भारताला स्वातंत्र्य मिळाले. त्यालाही आता ७५ वर्षे झाली आहेत. भारतीय नागरिकांनी देशावरील ब्रिटिशांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी ९० वर्षे संघर्ष केलेला आहे. त्याला आता ७५ वर्षे होत आहेत. संपूर्ण देशात हे वर्ष अमृत महोत्सव म्हणून साजरे केले जात आहे. याचा अर्थ असा होतो की, आज हयात असलेल्या सर्वात कनिष्ठ स्वातंत्र्य सैनिकाचे वय ९५ ते १०० वर्षे असले पाहिजे. सर्व वसाहतवादी सत्तांच्या विरोधातही भारतीय क्रांतिकारी लढले आहेत. या सर्वाच्या संघर्षातून आणि बलिदानातून १५ ऑगस्ट १९४७ रोजी अंतिमतः भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य लढ्यानंतर झालेल्या १९६० सालच्या गोवा मुक्ती संग्रामात सहभागी झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांनाही आपल्या देशात स्वातंत्र्य सैनिकाचा दर्जा देण्यात आला आहे.

ब्रिटिश सरकारला दहशत बसविणाऱ्या क्रांतिकारक पंथाच्या पारंब्या कोकणातही पोहचल्या होत्या. कोकणात सत्याग्रहाचा वणवा पेटला होता. पुर्वीच्या काळी ठाणे जिल्हयात असलेला सध्याचा पालघर जिल्हा देखील या वणव्याने होरपळला होता. पालघर जिल्हयात सावंत मास्तर , सखाराम भी.पाटील, छोटालाल श्राफ, बाबासाहेब दांडेकर, धर्माजी तांडेल, बाबुराव जानू, र.कृ.परुळेकर, भोगीलाल शहा, हरी दा.राऊत, र.ल.शिंदे, रंगनाथ वरदे, मुकुंद संखे, भुवनेश किर्तने, सौ.रमा दांडेकर, सो.मंजूळा पागधरे, मारुती मेहेर, तात्या सामंत, डॉ.ए.आर.पाटील हे स्वातंत्र सैनिक झाले. १९४२ च्या आंदोलनात पालघर जिल्हयातील सामान्य जनतेने अभूतपूर्व उठाव केला होता. माहिम पालघर भागात १९१६ च्या आसपास राजकीय हालचालींना प्रत्यक्षात आरंभ झाला. मार्च १९१८ च्या प्रथमार्धात लोकमान्य टिळकांनी ठाणे जिल्हयाचा दौरा केला. त्याच दरम्यान त्यांनी पालघरला सभा आयोजित केली. १९०४ पासून शिक्षणानिमित्त पुण्यात असलेले बाबासाहेब दांडेकर यांच्या घरासमोरील भव्य मंडपात ही सभा आयोजित केली. लोकमान्य टिळकांसारख्या एका महान राष्ट्रीय नेत्याचा प्रथमच पदस्पर्श या भूमिला होणार असल्याने सभेला वसई, वाडा, जव्हार,डहाणू या भागातून खूप मोठा श्रोतृवर्ग उपस्थित होता. टिळकांनी आपल्या भाषणात स्वराज्य का हवे, हे ओजस्वीवाणीत सांगितले. आणि होमरुल लिगची माहिती दिली. पालघरच्या परिसरात राष्ट्रीय चळवळीचा भक्कम पायाच लोकमान्य टिळकांच्या हस्ते घातला गेला. होमरुल कार्यालयास पालघर तालुक्याने त्या काळात रुपये ३ हजार ६०० चा निधी दिला. १९२८ साली सरदार पटेल यांना पालघर येथे आमंत्रित केले. बार्डोलीचे विजयी सरदार म्हणून गणेश गं. दांडेकर यांच्या पटांगणात ८-१० हजार श्रोत्यांसमोर रात्रीच्या वेळी त्यांचे स्फूर्तिदायक भाषण झाले. गांधीजींचे विचार आणि लढण्याची पध्दत त्यांनी लोकांना समजावून सांगितली. त्यामुळे गांधीजींच्या नव्या सत्याग्रह पध्दतीने सामर्थ्य येथील जनतेच्या मनावर बिंबले. पालघर तालुक्यात गांधी युगाचा आरंभ सरदारांच्या हस्ते झाला.

कॉंग्रेस कार्यकारणीने तयार केलेल्या चलेजाव ठरावाला या आधिवेशनात लाखो लोकांच्या मुखाने प्रचंड गर्जना करून संमती देण्यात आली. स्वदेशाच्या मुक्ततेच्या या लढयासाठी करेंगे या मरेंगे या निर्धाराने आपली शक्ती सर्वस्व पणाला लावणे हे प्रत्येक भारतीयाचे परम कर्तव्य आहे. आपण आजपासून स्वतंत्र भारताचे एक नागरिक आहोत या भावनेने प्रत्येकाने प्राण झोकून काम करावे, रक्ताचे पाट वाहिले तरी चालतील. अशा प्रकारच्या स्फूर्तीदायक वचनांनी ओतप्रोत भाषणे ऐकून सर्वाची अंतकरणे भारावून गेली. येथूनच एका अभूतपूर्व क्रांतियुध्दाचे रणशिंग फुंकले गेले.

चले जाव अधिवेशानंतर दुसऱ्या दिवसापासून मुंबईत १४ ऑगस्ट १९४२ रोजी लोक आंदोलनाला सुरुवात झाली. पाठोपाठ वसई, पालघर, बोर्डी, डहाणू या मुंबई लगतच्या भागातही लोकांची प्रक्षुब्ध निदर्शने सुरु झाली. त्यानुसार पालघर तालुक्यात विविध ठिकाणी मोर्चे काढण्यात आले. निघालेल्या मोर्चावर पोलीसांनी अमानुष लाठी हल्ला-गोळीबार केला. या गोळीबारात गोविंद गणेश ठाकूर, नांदगांव, वय-१७, काशिनाथ हरी पागधरे, सातपाटी वय-२६ ते २७, रामप्रसाद भिमाशंकर तिवारी, पालघर वय-१७, रामचंद्र माधव चुरी, मुरबे वय-२४ ते २६, सुकूर गोविंद मोरे, शिरगांव वय-२२ ते २३, हे पाच स्वतंत्र सेवक हुतात्मे झाले. २२ जण कमी अधिक जखमी झाले. त्याच दिवशी चिंचणी येथेही क्रुरपणे गोळीबार झाला. त्यात दोन स्वतंत्र सेवक हुतात्मे झाले. पश्चिम किनारपट्टीवर मोठया प्रमाणात निदर्शने झाली. ती सरकारने निर्दयीपणे चिरडून टाकण्यास सुरुवात केली. निशस्त्र व अहिंसक जमावावर बेछुट लाठया-बंदुका चालविण्यात आल्याने भिषण रक्तपात झाला. त्यामुळे काही दिवस दहशतीचे वातावरण निर्माण होऊन पालघरमधील जनतेचे मनोधैर्य खालावले.

पालघरचा गोळीबारात सातपाटीचे काशिनाथ पागधरे, नांदगांवचे गोविंद ठाकूर यांची समोरून क्रुरहत्या केल्याचे लोकांनी प्रत्यक्ष पाहिले. त्यामुळे या दोन्ही गावातील जनतेत विशेषत: तरुण कार्यकर्त्यांच्या मनात या घटनेचा सुड घेण्याची भावना निर्माण झाली. या मंडळींनी प्रथम स्फोटके वापरून पालघर ते बोईसर दरम्यानचा रेल्वे मार्ग उद्वस्त करण्याचा कट रचला होता. यातील अनेक कार्यकर्ते नवशिके असल्याने तसेच स्फोटके हाताळण्याचा अनुभव नसल्याने स्फोटके न वापरता फक्त हत्यारांनी रेल्वे मार्ग उखडून गाडया पाडण्याचा कट रचण्यात आला. त्यानुसार २६ ऑक्टोंबर १९४२ रोजी मुंबईकडून येणाऱ्या पालघर ते बोईसर दरम्यानच्या रेल्वेमार्गाचा ३० ते ३५ फुटांचा तुकडा काढून पुलाखाली टाकण्यात आला. गाडी नेहमीच्या वेगाने धडपडत आली. वाफेचे इंजिन पुलावरून जातांना घसरले. घसरलेले इंजिन खाली न कोसळता पुलावरून पलिकडे जाऊन पुन्हा रुळावर चढले. इंजिनच्या मागे लागलेले २५-३० डबे खाली कोसळले. पण त्यात कोणताही स्फोट झाला नाही. दुसऱ्या दिवशी नित्याप्रमाणे सर्वानी रोजचा दिनक्रम सुरु केला. या घटनेचा घरच्या मंडळींनाही पत्ता लागू दिला नाही. ही घटना म्हणजे भारताच्या स्वतंत्र संग्रामातील एक तेजस्वी साहसी कथा म्हणून ओळखली जाते.

१४ ऑगस्ट १९४२ रोजी झालेल्या गोळीबारातील पाच हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतीने पालघरमधील लोकांची मने एकत्र बांधली गेली. या हुतात्म्यांचे पुण्यस्मरण करण्यास दि.१४ ऑगस्ट १९४४ पासून प्रारंभ झाला. प्रत्यक्षात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५० साली गोळीबार चौकात हुतात्मा स्तंभ उभा करण्यात आला. या स्तंभाला पाच दिवे लावून १४ ऑगस्ट १९४२च्या गोळीबारातील पाच हुतात्म्यांची स्मृती चिरस्थायी करण्यात आली आहे. स्तंभावरील शिळेवर या हुतात्म्यांची नांवे नोंदविली आहेत. हाच गोळीबार चौक तेव्हापासून हुतात्मा चौक किंवा पाचबत्ती या नावाने ओळखला जाऊ लागला. पालघरमध्ये १४ ऑगस्ट हा हुतात्मा दिन म्हणून साजरा केला जातो. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव होत असतांना हे स्मरण नव्या पिढीला निश्चितच उपयुक्त ठरेल!

**संदर्भ- स्वातंत्र्य आंदोलनात पालघर तालुका.**

**- प्रविण डोंगरदिवे,** माहिती सहाय्यक
विभागीय माहिती कार्यालय,
कोकण विभाग, नवी मुंबई

मुंबई विद्यापीठात शाहीर अमरशेख जयंती समारंभाचे उद्घाटन

# महाराष्ट्राच्या विविध भागातील लोककलेचा एकत्रित आराखडा तयार करावा - उदय सामंत

**मुंबई/प्रतिनिधी**



महाराष्ट्र हे सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न राज्य आहे. महाराष्ट्राच्या मातीत परंपरेने रुजलेल्या अनेक कला आहेत. देशपातळीवर महाराष्ट्राचे नाव अभिमानाने-गौरवाने घेतले जाईल, अशी लोककला आपण जपली पाहिजे. त्यासाठी लोककलेचा विभागानुसार एकत्रित आराखडा तयार करावा, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर, भारत सरकार आणि शाहीर अमरशेख अध्यासन लोककला अकादमी संगीत विभाग मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने शाहीर अमरशेख जयंती समारंभाचे उद्घाटन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी श्री. सामंत बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. सामंत म्हणाले, आपली संस्कृती, लोककला विद्यापीठांनी जपली पाहिजे. महाराष्ट्रात अनेक मोठ्या ताकतीचे कलावंत आहेत. त्यांच्या कलेला योग्य ठिकाणी संधी देऊन अधिकाधिक लोकांपर्यत ती कला कशी पोहोचेल याचे योग्य नियोजन केले पाहिजे. समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षण घेणे जसे आवश्यक आहे, तसेच आपली बहुमोल संस्कृती टिकविणे देखील तेवढेच गरजेचे आहे. त्यासाठी आपली लोककला जिवंत राखण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे. राज्याच्या लोककलेचा सर्वसमावेशक आराखडा लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ यांनी तयार करावा. यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे बैठक घेऊन याबाबत सकारात्मक निर्णय घेऊन त्यासाठी लागणारी आर्थिक मदतही करण्यात येईल, असे आश्वासनही श्री.सामंत यांनी यावेळी दिले. यावेळी पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे निदेशक सोनी गुप्ता, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. विनोद पाटील, मानव्यविद्या मुंबई विद्यापीठ अधिष्ठाता डॉ.राजेश खरात, प्रख्यात सिने-नृत्य दिग्दर्शिका श्रीमती फुलवा खामकर, शाहीर अमरशेख अध्यासन केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ.प्रकाश खांडगे, लोककला अकादमीचे विभाग प्रमुख प्रा.डॉ.गणेश चंदनशिवे उपस्थित होते.

# भिवंडी महापालिकेच्या प्रांगणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यास जिल्हा समितीची मान्यता

**भिवंडी/आकाश गायकवाड**



मनपा मुख्यालयाच्या आवारात भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बनविण्यात आला असून या पुतळ्याचा लोकार्पण सोहळा लवकरच होणार आहे. या पुतळ्यासाठी शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या सर्व परवानग्या मिळाल्या असून, याबत गुरुवारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुतळा समितीच्या अध्यक्षांच्या उपस्थितीत झालेल्या ठाणे जिल्हा पुतळा समिती बैठकीत मान्यता देखील मिळाली आहे. त्यामुळे मनपा मुख्यालयाच्या आवारात बनून तयार असलेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे अशी माहिती सभागृहनेते विकास निकम यांनी दिलेली आहे. भिवंडी मनपा मुख्यालयाच्या प्रांगणात डॉ. बाबासहेबांचा पूर्णाकृती पुतळा बनून तयार झाला आहे मात्र अनेक दिवसांपासून या पुतळ्याचे अनावरण व लोकार्पण झाले नसल्याने आंबेडकरी अनुयायांमध्ये मनपा प्रशासनाविरोधात संतापाची लाट उसळली होती. अनेक आंबेडकरी संघटनेच्या माध्यमातून पुतळ्याचे अनावरण लवकरात लवकर करण्यात यावे अशी मागणी होत होती. त्यासाठी आंदोलन देखील काही दिवसांपूर्वी करण्यात आले होते. अखेर जिल्हा पुतळा समितीची मान्यता मिळाल्याने या पुतळ्याचे लवकरच अनावरण होणार असल्याने आंबेडकरी अनुयायांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

25 TO 31 OCTOBER 2021 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 23/10/2021 9:45 PM Page 1



# चंद्रपूरमध्ये प्रियकराने केली प्रियसीच्या पतीची हत्या

**चंद्रपुर/क्राईम रिपोर्टर**

१६ ऑक्टोंबर रोजी पडोली पोलील ठाण्याच्या हद्दीत सकाळी खबर मिळाली की, सिनरर्जी वर्ल्ड परीसरातील मागील बाजूस एका अनोळखी पुरूषाचे प्रेत रक्ताचे थारोळ्यात पडल्याची माहिती प्राप्त झाली. माहिती मिळाल्यानंतर अरविंद साळवे पोलीस अधिक्षक चंद्रपुर, अप्पर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी व पो.नि. बाळासाहेब खाडे स्थानिक गुन्हे शाखा यांनी घटनेचे गांभीर्य पाहून घटनास्थळावर तात्काळ त्या ठिकाणी भेट दिली. घटनास्थळावरील गर्दीतून वाट काढत मृतक या पर्यत पोहोचले. पडलेल्या मृतदेहाची बारकाईने तपासणी करून मृत व्यक्तीचे गावकऱ्यांकडून विचारपूस केली असता त्याला कोणी ओळखत नाही कळाले. पडून असलेला मृतक हा अनोळखी असून त्याचे अदर्याप पर्यत ओळख पटलेली नव्हती तसेच घटनास्थळावर कुठलाही पुरावा किंवा हत्यार दिसून येत नव्हते.

सदर घटनेचे गांभीर्य पाहून संदरचा खुन हा गुंतागुंतीचा व क्लीष्ट असल्याने या गुन्हयाचा समांतर तपास करण्याचे आदेश मा.पोलीस अधीक्षक अरविंद साळवे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, बाळासाहेब खाडे यांना दिले. पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे यांनी तात्काळ एक विशेष पथक तयार करून तपास सुरू केला . घटनास्थळावर एक ४० ते ४५ वयाचा इसम रोडचे कडेला रक्ताचे थारोळ्यात पडलेला होता. बारकाईने पाहणी केली असता त्याचे डोक्यावर जबर जखमा दिसून आल्या. त्यावरूण सदर मृतकाची ओळख पटवण्याकामी स्थानिक गुन्हे शाखाचे अधिकरी व कर्मचारी यांनी तपास सुरू केला. त्यावरून पथकाने दुर्गापूर, बंगाली कॅम्प, रैय्यतवारी, अष्टभुजा, प्रकाश



नगर अशा विवीध भागात मृतकाचा घटनास्थळावरील फोटो लोकांना दाखवून अनोळखी मृतक इसम कोण आहे . या बाबत माहिती घेतली असता पोलीस उपनिरीक्षक, संदीप कापडे यांचे पथकास यातील मृतक हा राजू अनंत मलीक वय ४५वर्षे व्यवसाय मजूरी रा. प्रकाश नगर, अष्टभुजा वार्ड चंद्रपूर हा असल्याचे निष्पन्न झाले. गुप्त माहिती कडुन माहीती घेतील असता त्याचे नाव राजू अनंत मल्लीक याच्या पत्नीचे बाह्य संबंध असल्याचे माहिती मिळाली.

गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी तपास सुरू केला. अधिक माहिती प्राप्त केली असता. मयत व त्याची पत्नी यांचेसह संशईत इसम नामे जितेंद्रसिंग भंडारी यांचे मैत्रीपूर्ण संबंध असल्याचे माहिती प्राप्त झाली. तसेच संशईत ईसम हा मयत व त्याचे पत्नीच्या सतत संपर्कात असल्या बाबत विश्वसनिय माहिती प्राप्त झाली. त्यावरून संशईत नामे जितेंद्रसिंग भंडारी याचे बाबत तांत्रीक तपास केला असता नमुद इसम दुर्गापूर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यास ताब्यात घेवून स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात घेवून आलो व पोलीस निरीक्षक बाळासाहेब खाडे व पो. उपनि संदीप कापडे यांनी त्याचेकडे कसून चौकशी केली परंतू संशईत ईसम हा उडवा उडविचे उत्तरे देत होता. त्या नंतर त्याची उलट सुलट चौकशी केली असता त्यावरून त्याने दिलेल्या माहिती वरून यातील संशईत ईसमानेच खुन केला असल्याचा संशय बळावला त्यानंतर त्याला विश्वासात घेवून पोलीस भाषेत विचारपूस केली असता त्याने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. त्याचेकडे मयता बाबत चौकशी केली असता त्याचे मयताचे पत्नी बरोबर मागील ५ वर्षापासून प्रेमसंबंध होते. ती मागील १ वर्षापासून मुलासह तिचे माहेरी कान्केर राज्य छत्तीसगड येथे गेलेली आहे. त्या दोघांचे प्रेमसंबंधामध्ये मयत ईसम हा अडसर होत असल्याने त्याला ठार मारण्याचा निश्चय आरोपी ईसमाने केला. त्यावरून १५/१०/२०२१ चे रात्रौ ०७:०० वा. दरम्यान आरोपीने मृतकास सिनरर्जी वर्ल्ड येथील निर्जन परीसरात नेवून त्याला दारू पाजली व त्यास लोखंडी रॉडने डोक्यावर मारून जिवानीशी ठार मारल्याचे कबुल केले. या गुन्हेत कोणत्याही पुरावा नसताना पोलीसांनी मोठ्या शिताफीने गुन्हे उघडकीस केला म्हणून म्हणतात की पोलिस गुन्हेगारा पेक्षा एक पाऊल पुढे असतात. सदरची यशस्वी कामगीरी अरविंद साळवे पोलीस अधिक्षक चंद्रपुर अप्पर पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांचे मार्गदर्शनात पो.नि. बाळासाहेब खाडे स्थानिक गुन्हे शाखा यांचे सह स्थानिक गुन्हे शाखा पथकाचे पोलीस उप निरीक्षक संदिप कापडे, सचिन गदादे, अतुल कावळे यांचे सह पो. हवा. संजय आतकुलवार स्वामी चालेकर, पंडीत वऱ्हाडे, ना.पो.कॉ. गजानन नागरे, पो.शि. प्रशांत नागोसे, अमोल धंदरे, संदीप मुळे, रविंद्र पंधरे, नितीन रायपूरे कुंदसिंग बावरी, प्रांजल झिलपे, गोपाल आतकुलवार, गणेश मोहूर्ले, दिपक डोंगरे, प्रशांत धुडगंडे, चानापोशि. दिनेश अराडे यांनी केली.

# तबेल्यातील मलमूत्रामुळे भात शेतीचे नुकसान



**वाडा/प्रतिनिधी**

विक्रमगड तालुक्यातील माळे गावातील जवळपास १२ शेतकऱ्यांच्या शेतीचे अतोनात नुकसान झाले असून गावात असलेल्या तबेले मालकाच्या बेजबाबदारपणामुळे हे नुकसान झाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. माळे गावाच्या हद्दीत मुकुंदगोपी फार्म नावाने एक तबेला असून यात तबेला मालकाच्या म्हणण्यानुसार १०० म्हैशी व ३५ गाई आहेत. तबेल्यातील शेण व मूत्र पावसाळ्यात खाली असलेल्या जवळपास ३० एकर शेतजमिनीत पसरते. भातशेती आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे अनिश्चित झाली असतांना तबेला मालकाच्या निष्काळजीपणामुळे भातशेतीला अति खत मिळत असल्याने तिचे अतोनात नुकसान झाले आहे. दोन वर्षापासून हा प्रकार सुरू असून अल्पभूधारक आदिवासी शेतकऱ्यांना या प्रकारामुळे उपासमारीची वेळ येणार असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. शेतकऱ्यांनी विक्रमगड तहसीलदार कार्यालयात याबाबत तक्रार केली असून अजूनही याबाबत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे लोकांचे म्हणणे आहे. पोटापूरती भातशेती पिकवणाऱ्या या शेतकऱ्यांना आता नुकसान भरपाई मिळावी तसेच तबेला मालकाच्या कृत्याला कायमचा आळा बसावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी किसान काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पराग पष्टे यांसह जिल्हा अध्यक्ष प्रफुल्ल पाटील यांनी भेट घेतली असून महसूल विभागात पाठपुरावा करून वेळ आल्यास कृषी मंत्र्यांकडे याबाबत दाद मागणार असल्याचे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले आहे. याप्रकरणी मुकुंद गोपी फार्मचे मालक मंदार चोगले यांच्याकडे विचारणा केली असताशेतकऱ्यांचे नुकसान होत आहे हे आम्ही नाकारत नसून मलमूत्र नियोजन आमच्याकडे उत्तम आहे. पावसाळ्यात मात्र अतिवृष्टीमुळे हे नियोजन बिघडून जाते व पाण्यासोबत शेण बाहेर वाहून जाते असे मत व्यक्त केले. दरम्यान माझ्या मुलीचे लग्न मागील वर्षी करतेवेळी घरात खायला अन्न नसल्याने लोकांनी मदत केल्याने कार्य संपन्न झाले. यंदाही भातशेतीचे अतोनात नुकसान झाले असून याबाबत तातडीने दखल घ्यावी, असे माळेपाडा येथील पीडित शेतकरी कल्पना थोरात यांचे म्हणणे आहे.

# केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतील गुणवंताचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते गौरव




**लातूर/करकरे अंबादास**

लातूर, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत लातूर जिल्ह्यातील युवक, युवती यांनी उज्वल यश संपादन केले आहे. हे सहा जणांचे यश म्हणजे जिल्हयातील अनेक युवकांना प्रेरणा देणारे तसेच लातूर जिल्ह्याचा गौरव वाढविणारे असल्याचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात युपीएससी परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंताच्या सत्कार दरम्यान हे गौरवोद्गार काढले. जिल्ह्यातील युवक, युवतींना अधिक प्रेरणा मिळावी म्हणून या सर्वाचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांच्या आणि जिल्हा माहिती कार्यालय, लातूर फेसबुक लाईव्ह आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल, अप्पर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे आदि विविध विभागाच्या विभाग प्रमुखांची यावेळी उपस्थिती होती. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत लातूर जिल्ह्यातील यशस्वी झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन करुन भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या यशस्वीतेसाठी आई,वडिल, बहिण, मित्र परिवार व नातेवाईंकाची मेहनत व आशिर्वाद असते. स्पर्धा परीक्षा सहज सोपी नसली तरी सकारात्मकता हे या यशाचा मंत्र आहे. देशातील ५ ते १० लाख उमेदवार या स्पर्धा परीक्षेची तयारी करुन परीक्षा देत असतात. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षेत यश पहिल्या प्रयत्नात मिळत नसते. लातूर जिल्ह्यातील सहा विद्यार्थ्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविले आहे. ही परीक्षा देण्यासाठी पेशंन्सची खुप आवश्यकता असते. ज्यांना पेशंन्स , मेहनत, जिद्द व चिकाटीची आवश्यकता असते. यातूनच परीक्षेची लढाई आपल्याला जिंकता येते, असेही जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. म्हणाले कु. पूजा कदम रँक -५७७, विनायक प्रकाशराव महामुनी रँक-९५, कमलकिशोर देशभूषण कंडारकर रँक-१३७ या तीन केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश संपादन केलेल्या यशस्वीतांचा लातूर जिल्ह्याची समग्र पर्यटनाविषयीची माहिती असलेलली वैभवशाली लातूर जिल्हा पर्यटन पुस्तिका शाल, पुष्पगुच्छ, पेन देवून गौरविण्यात आले. या फेसबुक लाईव्ह कार्यक्रमात या तिन्ही परीक्षेत यशस्वी झालेल्या यशस्वीतांचे अनुभवही या माध्यमाद्वारे व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लातूर जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांनी केले.

# कार मधून जाणाऱ्या दोघांवर हल्ला करून लुटणाऱ्यांना अटक

**भिवंडी/अभिजित हिरे**

मैत्रिणी सोबत कार मधून जाणाऱ्या तरुणावर अचानक जीवघेणा हल्ला करून त्याच्या व मैत्रणीकडील मोबाईल व सोन्याचे दागिने घेऊन फरार झालेल्या चोरट्यांना कोनगाव पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. अब्दुल कादिर अबरार शेख (वय २४ वर्षे, रा. मोईवाडा, कल्याण, प.), उमर अब्दुल रहेमान मन्सुरी (वय २४ वर्षे, रा. गोविंदवाडी, कल्याण, प), निहाल नजीर शेख (वय २३ वर्ष रा, गोविंदवाडी, कल्याण, प.) अशी अटक केलेल्या लुटारूंची नावे आहेत. तर या चोरट्यांकडून चोरीचा मुद्देमाल घेणाऱ्या दोघांनाही अटक केली आहे. आकाश राजेश कंडारे (वय २४ वर्षे), सलमानउर्फ नजीब मस्जीद शेख (वय २७ वर्ष) असे चोरीचा मुद्देमाल विकत घेणाऱ्या अटक आरोपींचे नावे आहेत. ठाणे शहरातील पाचपाखाडी भागात राहणारे दर्शिल हितेश गुका वय २७ वर्ष) हे त्यांच्या मैत्रिणीसोबत १२ आक्टोंबरच्या मध्यरात्री मारुती रिटस कारने भिवडी पाईपलाईन रोडने डोगराळीकडुन घरी ठाणे येथे जात होते. त्यावेळी अचानक रेल्वे पुलाखाली अनोळखी तिन जणांनी त्याच्या कार समोरच दुचाकी आडवी लावून उभी केली. विचारपूस करण्यासाठी दर्शिल कार मधून बाहेर पडताच तिघा चोरटयांनी त्याचा मोबाईल हिसकावला तसेच मैत्रीणकडीलही मोबाईल, तिच्या गळ्यातील सोन्याची चेन व हातातील सोन्याची अंगठी असा एकूण ८३ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने काढून घेतला. त्यावेळी दर्शिलने चोरट्यासोबत प्रतिकार केला असता त्याच्या डोक्यात लाकडी दांडक्याने जोरदार प्रहार करून मुद्देमाल घेऊन घटनस्थळावरून फरार झाले. तर चोरट्यांच्या हल्ल्यात दर्शिल याला गंभीर दुखापत झाल्याने त्याच्यावर ठाण्यातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल



केले. याप्रकरणी कोनगाव पोलीस ठाण्यात विविध भादवि कलमानुसार गुन्हा दाखल केला. मात्र याघटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातारवण निर्माण झाले. चोरटयांनी गुन्हा करताना निर्जनस्थळ व रात्रीच्या अंधाराचा फायदा घेऊन केला होता. त्यामुळे पोलिसांकडे हा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी कुठलाही सुगावा नसल्याने पोलिसांसोर मोठ आव्हान होते.

या गुन्हयातील आरोपींचा शोध घेण्यासाठी तीन पोलीस पथके नेमली होती. त्यांनतर पोलीस तपासात व गुप्त बातमीदारामार्फत तसेच तांत्रिक तपासाच्या आधारे गुन्हयातील अब्दुल कादिर अबरार शेख, उमर अब्दुल रहेमान मन्सुरी, निहाल नजीर शेख, यांना कल्याणमधून ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता, तिघांनाही गुन्हा केल्याचे कुबल केले. मात्र लुटमारीतील मुद्देमाल इतर दोघांना विक्री केल्याने मुद्देमाला हस्तगत करण्यासाठी पोलिसांनी सापळा रचून आकाश राजेश कंडारे आणि सलमान उर्फ नजीब मस्जीद शेख दोघांनाही अटक करून त्यांच्याकडून चोरीचा विकत घेतलेला मुद्देमाल जप्त केला. तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकीही जप्त केली आहे.

गुन्हयाच्या प्रकरणी अटक केलेल्या पाचही आरोपींचा कोनगाव पोलिसांनी अधिक तपास केला असता, आरोपी हे रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असल्याचे तपासात समोर आले. आरोपी अब्दुल कादिर अवरार शेख ३ गंभीर गुन्हे, उमर अब्दुल रहेमान मन्सुरी ३ गुन्हे, निहाल नजीर शेख १४ गुन्हे आणि चोरीचा मुद्देमाला विकत घेणाऱ्या आकाश याच्यावर तब्बल १४ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलीस उपआयुक्त योगेश चव्हाण यांनी दिली. तर हा गुन्हा उघडकीस सपोनि किरणकुमार वाघ आणि गुहे प्रकटीकरण पथकातील पोलीस उपनिरीक्षक पराग भाट यांच्यासह पथकाने कामगीरी बजावली आहे.

# एकाच दिवशी ४३ गावांमध्ये वेगवेगळे कायदेविषयक शिबीर आणि शासकीय योजनांविषयी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन

**वाडा/प्रतिनिधी**

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या आदेशाने तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, ठाणे यांच्या मार्गदर्शनाने दि. २ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर या कालावधीमध्ये चालणाऱ्या संपूर्ण भारतभर जनजागृती व संपर्क अभियानाचा भाग म्हणून मंगळवारी (दि.१९ ऑक्टोबर) वाडा तालुका विधी सेवा समिती व वाडा तालुका वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने व वाडा तहसील कार्यालय आणि वाडा पंचायत समिती यांच्या सहकार्याने वाडा तालुक्यात एकाच दिवशी ४३ गावांमध्ये वेगवेगळे कायदेविषयक शिबीर व शासकीय योजनांविषयी जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमामध्ये वाडा न्यायालयाचे न्यायाधीश मनोहर सैंदाणे, तहसीलदार उध्दव कदम, निवासी नायब तहसीलदार सुनिल लहांगे, बालविकास प्रकल्प अधिकारी अस्मिता बिर्जे तसेच तालुका वकील संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्याकरिता सहभाग घेतला. सदर कार्यक्रमासाठी अधिकारी व वकीलांच्या एकुण ११ टीम तयार करण्यात आल्या. हे शिबीर वाडा तालुक्यातील परळी, ओगदा, गारगांव, हरसोळे, मांडवा, डाहे, सोनशिव, वरले, सापने, पोशेरी, कंचाड, वावेघर, गोऱ्हे, देवळी-आपटी, खारीवली, खानिवली, पालसई, गौरापूर, देवघर, गातेस, कोनसई, निचोळे, जामघर, भावेघर, बिलोशी, खारीवली बागलान, अब्जे, नेहरोली, चिखले, खुपरी, लखमापूर, कोने, आबीटघर, तिळगांव, कांभारे, सारसी, तुसे, मोज, सोनाळे, आमगांव-अंभई, हमरापूर, गालतरे व सांगे-नाणे या गावांत घेण्यात आली. सदर शिबीरांमध्ये राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांची योजना, आरोपी व कैदी यांचे अधिकार, महिलांचे अधिकार, वैकल्पिक वाद निवारण पध्दती, शिक्षणाचा अधिकार, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५, कुळ कायदा, विधी सेवा प्राधिकरण यांचेकडून देण्यात येणाऱ्या सुविधा केंद्र व राज्य शासनाच्या योजना तसेच एकात्मिक बालविकास योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



सदर शिबीराच्या वेळी व नंतर गावातील लोकांना कायद्याची माहिती असणारी पत्रके वाटण्यात आली. परळी, ओगदा व गारगांव या ठिकाणी तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा न्यायाधीश मनोहर सैंदाणे यांनी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (आदिवासी हक्क, संरक्षण व कार्यवाही) योजना २०१५, वैकल्पिक वाद निवारण पध्दती व विधी सेवा प्राधिकरण यांच्याकडून देण्यात येणाऱ्या सुविधा या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच दिव्यांग व्यक्ती, अटकेतील व्यक्ती, अनुसुचित जाती जमातीतील व्यक्ती, नैसर्गिक आपत्ती व हिंसाचाराचे बळी, ज्यांचे उत्पन्न तीन लाख रुपयांच्या आत आहे अशा शोषित घटकांसाठी मोफत विधी सल्ला व सहाय मिळू शकते याविषयी देखील माहिती दिली.

सदर कार्यक्रमांमध्ये तहसीलदार डॉ. उध्दव कदम यांनी शासनाच्या कल्याणकारी योजना व कुळ कायद्याचे कलम ३२ (ग) अन्वयेची चौकशी व कलम ३२ (म) प्रमाणे प्रमाणपत्र दिल्यास कुळ म्हणून हक्क प्रस्थापित होतात असे मार्गदर्शन केले. बालविकास प्रकल्प अधिकारी अस्मिता बिर्जे यांनी एकात्मिक बालविकास योजनांबाबत विस्तृत माहिती दिली. तिन्ही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वकील संतोष डेंगाणे यांनी केले. सर्व शिबीरांचे आयोजन करण्याकरिता तहसीलदार उध्दव कदम, गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ व त्यांच्या टीमने सहकार्य केले. तसेच वाडा तालुका वकील संघाचे सर्व वकील सभासद, अंगणवाडी सुपरवायझर व त्यांच्या टीम, तसेच वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक डी.टी. धुस, सर्व संबंधित बिट अंमलदार व पोलीस पाटील यांनी सुध्दा सहकार्य केले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्याकरिता दिनेश जोशी, सरिता फड, रोहित काळे व इतर न्यायालयीन कर्मचाऱ्यानी परिश्रम घेतले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई बनावट विदेशी दारू विक्री करणाऱ्या तिघे गजाआड



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

नवी मुंबई एमआयडीसी पोलीस स्टेशन अंतर्गत शिळफाटा रोडवर एका कारची झडती घेतली असताना कारमधून हजारो रुपयांची बनावट विदेशी दारू वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी कार व बनावट विदेशी दारू जप्त केली आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्याला मिळालेल्या माहितीनुसार शिव फाटा फाट्यावरून एक होंडा सिटी कार मधून बनावट विदेशी दारू वाहतूक करण्यास असल्याची खबर मिळाली होती. दारूबंदी पोलिसांनी शिळफाटा कोपरखैराणे व जुईनगर येथे सापळा रचला होता. वाहतूक करणारे गुन्हेगार सराईत असून त्यांनी आपला मार्ग बदलला. मात्र शिळफाटा फाट्यावरून नवी मुंबईत प्रवेश करण्याच्या विचारात होता. परंतु राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पोलिसांनी विविध ठिकाणी सापळा रचलामुळे त्यामुळे गुन्हेगार पोलिसांच्या हातून निसटू शकला नाही. संशयास्पद होंडा सिटी कार फाटा रोडवरून जात असताना पोलिसांनी अडवून झडती घेतली. त्यावेळेस हजारो रुपयाचा विदेशी बनावट दारू मिळून आली. पोलीसांनी एक होंडा सिटी कारसह १३ लाख ६७ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. या कारवाईत एन.एच. गोसावी, दुय्यम निरीक्षक, ई-२ विभाग ठाणे आर. के. शिरसाठ, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, डी विभाग ठाणे. पी. आर. तापडे, निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, एफ विभाग ठाणे. एस. व्ही. भोसले, दुय्यम निरीक्षक, एफ-१ विभाग, ठाणे. के. एन. पवार, दुय्यम निरीक्षक, एफ-२ विभाग ठाणे. संदीप एम. पाटील, जवान ब. क्र. ८१, श्रीमती. एन. जी. लांडे, महिला जवान ब. क्र. ३९ यांनी सदर गुन्हा नोंदीविण्या कामी मदत केली.

25 TO 31 OCTOBER 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 23/10/2021 9:46 PM Page 1



# वाड्यातील गारगाव येथे जिल्हा महिला कृषी मेळावा संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**

शेतकरी महिलांचा सन्मान वाढवणारा 'राष्ट्रीय महिला किसान दिन यानिमित्त पालघर जिल्हा कृषी विभाग व माविम यांच्या पुढाकाराने, कृषी विज्ञान केंद्र, कोसबाड आणि आत्मा यांच्या सहकार्याने संध्याकाळी वाडा तालुक्यातील गारगाव मध्ये शुक्रवारी (दि.२२ ऑक्टोबर) जिल्हा महिला कृषी मेळाव्याचं आयोजन करण्यात आले होते. स्वामिनाथन समितीचे चेन्नईहून आलेले कार्यकारी संचालक डॉ.हरिहरन, कानपूरहून आलेले डॉ.यादव, केव्हीकेचे कृषी शास्त्रज्ञ डॉ.जाधव, डॉ.देशमुख, वाडा पं.स चे उपसभापती अमोल पाटील, माजी सभापती योगेश गवा, विभागिय कृषी अधिकारी जाधव, आत्माचे अधिकारी बांगर, सामाजिक कार्यकर्ता संतोष




रसाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माविमच्या अध्यक्ष ज्योती ठाकरे या होत्या. यावेळी त्यांच्या हस्ते कृषीविभागाच्या विविध योजनांची माहीती देणाऱ्या घडीपट्टीचे विमोचन व त्यानंतर उपस्थित महिलांना घडीपट्टीचे वितरण करण्यात आले. कोविड काळात फळपिकांची विक्री स्वतः रस्त्याच्या कडेल उभे राहून विक्री करणाऱ्या माजी सभापती तथा प्रगतशील शेतकरी शालिनीताई पाटील, कृषीभूषण पतीच्या पाठी समर्थपणे उभे राहात ट्रॅक्टरसह सर्व शेती औजारे व यंत्र लिलया चालवणाऱ्या अश्विनीताई पाटील यांच्यासह शेतीमध्ये नवनविन प्रयोग करून आपल्या संसाराला हातभार लावणाऱ्या दहा प्रगतशील शेतकरी महिलांनाही प्रशस्तीपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते यावेळी गौरवण्यात आले. माविमतर्फे जिल्ह्यात यशस्वी ठरलेल्या शेती औजार किटचा डेमो दाखवण्यात आला तसेच आत्मातर्फे देण्यात येत असलेल्या व्हॅनचे लोकार्पण दहीवली येथील शेतकरी गटाला तर कृषीविभागातर्फे प्रत्येकी चार भाजीपाला क्रॅटसह व आधुनिक वजनकाट्यांचे महिलांना वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी तालुका कृषी विभाग आणि गारगावची एकलव्य संस्था यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मंगळवेढा दरोडा व सांगोला खूनप्रकरणी तपासासाठी स्वतंत्र पथके स्थापन करा -पो.अधीक्षक तेजस्वी सातपुते

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

मंगळवेढा येथील दरोडा व सांगोल्यातील खून प्रकरण यासाठी स्वतंत्र पथके तयार करुन या गुन्ह्याचा उलगडा करा तसेच मंगळवेढा व सांगोला येथील गुन्हे पेंडन्सी प्रमाण सध्या ४० टक्के असून ते २५ टक्क्यांवर आणावे अशा सूचना सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांनी दोन्ही पोलीस ठाण्यांच्या पोलीस अधिकाऱ्यांना दिल्या. मंगळवेढा येथील उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयाच्या वार्षिक तपासणी नंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या.



मंगळवेढा शहरातून अवजड वाहतूक सुरू असून ही वाहतूक तात्काळ बंद करा सध्या शाळा चालू झाल्याने दामाजी चौकात मोठ्या प्रमाणात गर्दी असते. परिणामी अपघाताची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे सातपुते यांनी अवजड वाहतूक बंद करण्याच्या सूचना पोलिस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे यांना केल्या. मंगळवेढा व सांगोला पोलीस ठाण्याचे गुन्हे पेंडन्सी प्रमाण ४० ते ४५ टक्के असून ते २५ ते ३० टक्क्यांपर्यंत खाली आले पाहिजे असे त्यांनी सांगितले शहरालगत असलेल्या संजय हजारे यांच्या बंगल्यावर दीड महिन्यापूर्वी दरोडा पडला होता. या दरोड्याचा तपास व सांगोला येथील प्रलंबित खून प्रकरण या दोन्ही घटनांचा तपास लावण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करुन त्याचा छडा लावण्याच्या सूचना यावेळी दोन्ही पोलीस निरीक्षकांना केल्या. येथील नवीन उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असून किरकोळ कामे निधीअभावी रखडले आहेत. निधीसाठी पोलीस अधीक्षक सातपुते यांनी थेट जिल्हाधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीवरून चर्चा केली. या दरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी निधी देण्यासाठी प्रयत्न केले जातील असे सांगितले. इमारतीचे बांधकाम पूर्ण होताच डीवायएसपी कार्यालयाचे तात्काळ स्थलांतर केले जाईल असे सातपुते म्हणाल्या. सध्या शाळा सुरू झाल्यामुळे गुंड प्रवृत्तीच्या मुलांकडून मुलींची छेडछाड होऊ नये याची खबरदारी म्हणून स्वतंत्र दामिनी पथक स्थापन करण्यात आले आहे. हे पथक छेडछाड, बालविवाह रोखण्यासाठी व आलेल्या तक्रारीवरून समुपदेशन करतील. ऑपरेशन परिवर्तन अंतर्गत व ग्रामसुरक्षा पथकाद्वारे चोरी अपहरण सारख्या घटनेतील आरोपी पकडण्यासाठी ग्राम सुरक्षा यंत्रणेला यश येत आहे. अपहरण घटनेतील मुला मुलीवर नियंत्रण मिळविण्यासाठी दोन हेल्पलाइनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यावेळी डीवायएसपी राजश्री पाटील, मंगळवेढा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्योतीराम गुंजवटे, सांगोला पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप उपस्थित होते.

# पेट्रोल, डिझेल आणि गॅस दरवाढीच्या विरोधात देवणी तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आंदोलन

**देवणी/प्रतिनिधी**

पेट्रोल, डिझेल व गॅसच्या दरात दररोज होणाऱ्या वाढीच्या विरोधात २० ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले त्याचाच एक भाग म्हणून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष महेबूब शेख, प्रदेश कार्याध्यक्ष सूरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव मनोज कनाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे देवणी तालुकाध्यक्ष प्रा.डॉ.अनिल इंगोले, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष अनिल कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली देवणी येथील लासोना चौकात गाड्या ढकलून व रिकाम्या गॅसच्या टाकीला हार घालून सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली व त्यासबंधीचे निवेदन महसूल विभाग व पोलीस प्रशासनाला देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन शिवाजीराव गवळी, तालुका कार्याध्यक्ष शंकर पाटील, देवणी शहराध्यक्ष जितेंद्र शिवगे, OBC सेलचे तालुकाध्यक्ष



दत्ता चाळकापुरे, सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष लक्ष्मण रणदिवे, जिल्हा उपाध्यक्ष अमरदीप बोरे, तालुका उपाध्यक्ष प्रमोद पाटील,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष अविनाश गरड, वैभव म्हेत्रे, प्रशांत बिरादार, जमीर मोमीन, बिलाल शेख, बालाजी चाफे, कृष्णा पिंजरे यांच्यासह इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# निकोटीनयुक्त 'अफजल' व 'सोएक्स हर्बल' हुक्का फ्लेवरचा ९ कोटींचा साठा केला जप्त



**भिवंडी/अभिजित हिरे**

शहरात मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे हुक्का पार्लर सुरू असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निकोटीनयुक्त हुक्का फ्लेवर वापरले जात असल्याने युवा पिढी नशेच्या आहारी जात असताना भिवंडीत गुन्हे शाखेने केलेल्या कारवाईत तब्बल ९ कोटी ३६ लाख ७८ हजार ५२० रुपयांचा महाराष्ट्रात प्रतिबंधित निकोटीनयुक्त 'अफजल' व 'सोएक्स हर्बल' या हुक्का फ्लेवरचा साठा जप्त केला आहे. गुन्हे शाखा भिवंडी चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांनी दिलेल्या माहिती नुसार ६ ऑक्टोबर रोजी गुप्त बातमीदारा कडून मिळालेल्या माहिती नुसार धामणकर नाका येथील अल्ताफ अत्तरवाला' या दुकानावर छापा टाकून महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेल्या हुक्क्याचे वेगवेगळ्या प्रकारचे ५७ हुक्का फ्लेवरचा ८९४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून त्या संदर्भात

नारपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून तपास करताना वरिष्ठांनी या गुन्ह्याचा सखोल तपास करण्याचे निर्देश दिल्याने भिवंडी शहर परिसरामध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये प्रतिबंधीत असलेल्या हुक्क्याच्या साठ्याचा शोध घेताना गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहिती नुसार दापोडा ग्रामपंचायत हद्दीतील हरीहर कॉम्प्लेक्स या गोदाम संकुलातील, हायस्ट्रीट इम्पेक्स लि. मुंबई या कंपनीच्या तीन गोदामांवर वपोनि अशोक होनमाने यांच्या नेतृत्वाखाली पोलीस पथकाने छापा टाकला असता गोदामात निकोटीनयुक्त 'अफजल हुक्का फ्लेवर' चे २८६२ बॉक्स - किंमत ८ कोटी ४२ लाख ४९ हजार ६१० रुपये व 'सोएक्स हर्बल फ्लेवर' चे ३७५ बॉक्स - किंमत ९४ लाख २८ हजार ९१० रुपये असा एकूण ९ कोटी ३६ लाख ७८ हजार ५२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात भिवंडी गुन्हे शाखेस यश मिळाले आहे. सदरचा 'अफजल हुक्का फ्लेवर' आणि 'सोएक्स हर्बल हुक्का फ्लेवर' हे दोन्ही हुक्का फ्लेवरचा माल 'सोएक्स इंडीया प्रा. लि. नरीमन पॉईट, मुंबई या कंपनीकडुन उत्पादीत व निर्यात केला जात असुन सदर उत्पादन केलेला हुक्का फ्लेवरचा माल सदर गोडावूनमधुन बेकायदेशिरपणे विकी केला जात आहे. सदर सोएक्स इंडीया प्रा. लि. या कंपनीकडुन बनविलेला निकोटीनयुक्त 'अफजल हुक्का फ्लेवर' हा माल भिवंडी शहर परिसरा सह ठाणे मुंबई यासह महाराष्ट्र राज्यामध्ये इतर ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये विक्री होत असल्याचे प्राथमिक तपासामध्ये निष्पन्न झाले असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांनी स्पष्ट केले आहे.

# नेट-सेट संघर्ष समितीकडून उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांचा सत्कार

**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील बिगर नेट तसेच सेट अध्यापकांना निवृत्तीवेतनाचा लाभ मिळत नव्हता. जवळपास २५ वर्षापासून प्रलंबित असलेला विषय मार्गी लागल्याच्या पार्श्वभूमीवर नेट-सेट संघर्ष समितीच्या वतीने उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय



सामंत यांचा मुंबईत सत्कार करण्यात आला. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री.सामंत म्हणाले की, यामध्ये जे अध्यापक २३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत नियुक्त होते अशांना हे निवृत्तीवेतन देण्यात येईल. शासन निर्णय १८ ऑक्टोबर २००१ व २७ जून २०१३ नुसार उपरोक्त कालावधीतील बिगर नेट-सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यत सुरु ठेवण्यात आल्या असल्याने त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक गृहीत धरुन सेवानिवृत्ती वेतन देण्यात येणार आहे. प्रा.डॉ.गोविंद काळे म्हणाले, नेट-सेट संघर्ष समिती महाराष्ट्र राज्यच्यावतिने १९९८ पासून सतत संघर्ष सुरू होता.

विद्यापीठ, युजीसी, महाराष्ट्र शासनाकडे सतत पाठपुरावा सुरू होता. जवळपास २५ वर्षापासून हा संघर्ष सुरू होता. गेल्या वर्षभरात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी सतत पाठपुरावा करून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत बैठका घेऊन आम्हाला न्याय दिला आहे. नेट-सेट संघर्ष समितीचे राज्यातील विविध भागातील पदाधिकारी यांच्यावतीने उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांचा महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीचा फोटो, सन्मान पत्र देवून व कवड्याची माळ घालून सत्कार करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना प्रांताध्यक्ष व अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष ज.मो. अभ्यंकर, प्रा.बिपिन शिंदे, प्रा. राजू कदम (औरंगाबाद) प्रा.चौधरी (सोलापूर) प्रा.अनिल पाटील (पणे) प्रा.डॉ.अविनाश शेंद्रे (मुंबई) प्रा.यु. जी. पाटील, प्रा.बी.एम. पाटील (जळगाव) आदि विद्यापीठाचे नेट/सेट संघर्ष समितीचे पदाधिकारी या वेळी उपस्थित होते.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, जव्हार, जि. पालघर**

**ऑफ लाईन निविदा सूचना क्रमांक-१० सन-२०२१-२२**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार हे खालील कामांच्या बी-१ नमुन्यातील (ऑफलाईन) सीलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम खात्याकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून मागवित आहेत. कोरे निविदा नमुन्याची विक्री कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार येथे खालील दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत करण्यात येईल. कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, जव्हार हे भरून पाठविलेल्या निविदा खालील तारखेस स्विकारतील व शक्य झाल्यास त्याचदिवशी उघडतील.

**टिप** : सदर निविदा सुचनेमध्ये एकूण **१२ (बारा)** कामे समाविष्ट आहेत. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार यांचे कार्यालयातील सूचना फलकावर सदरची निविदा पाहावयास मिळेल.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रुपये लक्ष जी.एस.टी. वगळून | इसारा रक्कम रुपये | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा संघांची किंमत | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | वाशाळा पिंपळगांव येथे गाव अंतर्गत, रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ८,१८,१५९/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| २. | सुर्यमाळ शासकिय आश्रमशाळा अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ८,३९,१५९/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ३. | पोशेरा पंगारपाडा रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ७,८९,५०४/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ४. | ठाकूरवाडी ते गाऱ्याचामाळ रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ७,८७,५५४/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ५. | खोच धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ७,८७,५३८/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ६. | पळसपाडा बहिरोबा मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ७,८७,५३८/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ७. | कुंडाचापाडा अंतर्गत रस्त्याची सुधारणा करणे. ता.मोखाडा, जि. पालघर | ७,९०,८८४/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ८. | पोशेरा पळसपाडा रस्त्याचे बांधकाम करणे. ता.मोखाडा, जि. पालघर | ७,८५,८३९/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ९. | हिंबटपाडा पूलालगत जोडरस्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि.पालघर | ७,७०,९९६/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| १०. | हिंबटपाडा गाव रस्त्याची सुधारणा करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ७,९१,४६१/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| ११. | वॉल ब्रिज पर्यटन स्थळ ते धबधबा रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ८,४५,१६३/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |
| १२. | चारनवाडी गाव अंतर्गत रस्त्याचे बांधकाम करणे. ता. मोखाडा, जि. पालघर | ७,८७,९१८/- | ९,०००/- | १०० दिवस | ५००/- + १८% जीएसटी रु. ९०/- एकूण - ५९०/- | |

निविदा उपलब्ध कालावधी    दिनांक : २८/१०/२०२१ ते दिनांक : ११/११/२०२१ पर्यंत
निविदा स्विकृतीचा    दिनांक : १२/११/२०२१ (दुपारी १४.०० वाजेपर्यंत)
निविदा उघडणे (शक्य झाल्यास)    दिनांक : १५/११/२०२१ (११.०० वाजता शक्य झाल्यास)

**टिप :-**

१. ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
२. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कसलेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार खालील स्वाक्षरी करणार यांनी राखून ठेवला आहे.
३. ठेकेदाराने कोरे निविदा नमुने पोष्टाने मागविल्यास ठेकेदारांच्या जबाबदारीवर पाठविले जाईल. त्यास विलंब झालेस खाते जबाबदार राहणार नाही. त्यासाठी रु. २००/- जादा आकार पडेल.

**जा.क्र./सा.बां.वि./जव्हार/निविदा/४२७८**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार**
**जिल्हा-पालघर, पिनकोड - ४०१ ६०३.**
**फोन नं. ०२५२०-२२२२३६**
**दिनांक : १८/१०/२०२१**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार**
**ता.जव्हार, जि. पालघर**

**विमाका/कोवि/२०२१-२०२२/१८९**

# नांदेड जिल्ह्यात रेशनधान्य वितरणात काळाबाजार

# मयताच्या नावाने धान्य उचलून काळ्या बाजारात



**नांदेड/नरेन भारती**

नांदेड जिल्ह्यात रेशनच्या धान्याचा काळा बाजार हा नित्याचाच झाला असून त्यात कोणतेही नियंत्रण राहिले नाही. सोळा तालुक्यातील रेशन वितरणात असलेली अनियमितता पुरवठा विभागाला दिसत नाही. त्यामुळे नांदेड जिल्ह्याचा पुरवठा विभाग हा महाराष्ट्रात गाजलेला आहे. नांदेड जिल्ह्यात सर्व तालुक्यात मयत झालेले लोक लाभार्थी म्हणून ठेवले आहेत आणि त्याच्या नावे धान्य उचलणे चालू आहे. सदरील याद्या अद्यापही अद्यावत करण्यात आल्या नाहीत. हदगाव, मुखेड, किनवट देगलूर या तालुक्यात प्रचंड प्रमाणात तफावत आढळून येत आहे. कोविड-१९च्या काळात लाभार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या पावत्या व अंगठ्याचे ठसे घेण्यात आले नाहीत. त्यात प्रचंड प्रमाणात काळा बाजार करण्यात आला आहे.

कोरोना साथीच्या फटक्याने हैराण झालेल्या दुर्बल जनतेला दिलासा देण्यासाठी गेल्या काही महिन्यापूर्वी पात्र लाभार्थ्यांना मोफत धान्य वितरणाचा उपक्रम चालू असला तरी या धान्याच्या काळाबाजाराने कळस गाठला आहे. सद्यस्थितीत रेशनच्या तांदळाचा काळाबाजार जोरात सुरु असून सोनखेड पोलीस ठाण्यात उभ्या असलेल्या दोन ट्रकने हा काळाबाजार पुन्हा एकदा उघडकीस आणला आहे. काही तालुक्यात तर धान्य आले नाही म्हणून ते काळ्याबाजारात विकले जाते. काही ठिकाणी अंगठ्याचे ठसे घेतले जातात पण धान्य कमी दिले जाते. त्याच्या पावत्याही दिल्या जात नाहीत. आतातर या तांदळाने खुली बाजारपेठ गाठली आहे. जे लाभार्थी श्रीमंत आहेत ते मिळालेला तांदूळ बाजारात विकतात. ज्याना गरज आहे त्याना मात्र तो मिळत नाही. नांदेड जिल्ह्यात पुरवठा विभाग हा भ्रष्टाचार बाबतीत क्रमाक एकवर आहे. कृष्णूर धान्य घोटाळ्याचा निकाल अजून लागला नाही तरी असे प्रकार सतत चालू आहेत. याचा अर्थ यांना पुरवठा विभागाचे अभय आहे.

राज्यभर गाजलेल्या नांदेड जिल्ह्यातील नायगाव, कृष्णुर येथील धान्य घोटाळ्यात हा जिल्हा गाजला. पुरवठा विभाग किती खालच्या थराला जाऊन धान्याचा काळाबाजार करू शकतो हे आता जनतेनी जाणले आहे. जुलै २०१८ मध्ये कृष्णूर धान्य घोटाळा उघडकीस आला होता. नायगाव तालुक्यातील कृष्णूर येथील 'इंडिया मेगा अ‍ॅग्रो अनाज' कंपनीत बेकायदेशीररित्या धान्य पुरवले जात असताना तेथे पोलिसांनी छापा टाकला होता. या छाप्यात ११ धान्याचे ट्रक पकडले होते. धान्य घोटाळ्याच्या व्याप्तीने हा बहुचर्चीत घोटाळा महाराष्ट्रभर गाजला होता आता अंमलबजावणी संचालनालयाने उडी घेतली आहे. याच प्रकरणी यातील मुख्य आरोपी असलेल्या इंडिया ॲग्रो अनाज लिमिटेड कंपनीचा ...पान ६ वर

# वलांडी येथे ईद-ए-मिलाद उत्साहात साजरी



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील वलांडी येथे इस्लाम धर्माचे शेवटचे संदेश वाहक आणि ज्यांच्याद्वारे पवित्र कुराण भूतलावर अवतरीत झाले असे हजरत मोहम्मद पैगंबर (सल्लाहू आलैही व सल्लम) यांची जयंती अर्थात ईद-ए-मिलाद मंगळवार दिनांक १९ ऑक्टोबर रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्य सामाजिक संस्था व मित्र मंडळाकडून वलांडी बस स्थानक परिसर आरास करून सजविण्यात आला होता व तसेच मशिदींवरही ही आकर्षक रोषणाई करण्यात आल्याने परिसरात उत्साहाचे वातावरण होते दरवर्षी इस्लामी महिन्यातील रबी उल अवल या उर्दू महिन्याच्या १२ तारखेला पैगंबर जयंती साजरी केली जाते या निमित्ताने वलांडी येथील बसस्थानक परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच पैगंबरांवर आधारित स्तुतीपर काव्य नात ए पाक कार्यक्रम झाले. तसेच यावेळी सरबत व खिचडी वाटपाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सरबत व खिचडीचा स्वाद वलांडी बसस्थानक परिसरातील नागरिकांनी मनमुरादपणे घेतला. पैगंबर जयंतीनिमित्त सकाळपासूनच मुस्लिम बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण होते.मंचावर पैगंबरांनी दिलेल्या मानवतेचा व एकात्मतेचा संदेश व मदिना शरीफच्या प्रतिकृतीचे फलक उभारण्यात आले होते.या वेळी इसराईल ताबोंळी,मौलाना नाहीद रजा, बाबूलाल पठाण, पिरसाब हुलसुरे,वाहेदसाब बौडीवाले, अझहर शेख, तोफिक जमीनदार, मनान शेख, मजरूदिन बौडीवाले, शब्बीर शेख, रीयाज मोमीन, साजीद पठाण, शिराज बौडीवाले, अतीक सौदागर इत्यादीनी परिश्रम घेतले.

# धरणे आंदोलन करणाऱ्या कुटूंबास मिळाला न्याय



**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील एका महिलेच्या राहत्या घर-जागेच्या मूळ मालकी नोंदीमध्ये मनपाच्या संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांने परस्पर मनमानीने व चक्क बेकायदा गैर फेरबदल केल्याप्रकरणी चालू असलेल्या धरणे आंदोलनाच्या ४६ व्या दिवशी अखेर कायदेशीर अंतिम न्याय प्राप्त झाल्यामुळे सदर कुंटूबीयांसह सामाजिक कार्यकत्यांनी जिल्हाधिकारी श्री पृथ्वीराज बी.पी. यांचे जाहीर आभार व्यक्त केले. दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयीन प्रतिनिधीं चिटणीस रविंद्र गायकवाड यांच्या हस्ते मनपाचे पूर्ववत मूळ दुरुस्तीपत्र स्वीकारुन, आपल्या बेमुदत सत्याग्रहाची दि.२२/१०/२०२१ रोजी यशस्वी सांगता केली.

या प्रकाराची थोडक्यात माहिती अशी की, लातूर येथील नि.मातोश्री रमाबाई सोसायटीतील श्रीमती भामाबाई कांबळे यांच्याकडून, सौ. आशाबाई इनामदार यांनी ३ वर्षाखाली रितसर घर- जागा खरेदी केली आणि मनपा कार्यालयात त्याची कायदेशीर नोंद केली. मात्र संबंधित विभागाच्या क्षेत्रीय अधिका-यांने कांही खाजगी लोकांना हातांशी धरून त्यामध्ये ३ वेळा परस्पर मनमानीने बेकायदा बदल करून ती जागा इतर गैर लोकांच्या नावे केली. या प्रकाराविरोधात आशाबाईनी सर्वत्र अर्ज करून न्याची मागणी केली. परंतु दाद कांही मिळाली नाही. तेव्हा आशाबाई इनामदार यांनी दि.६/९/२०२१ पासून मा.जिल्हाधिकारी कार्यालयावर, बेमुदत धरणे आंदोलन सुरु केले. तेव्हा झोन अधिका-यांने दुरुस्ती करण्याचे लेखी मान्य करूनही, प्रत्यक्ष कार्यवाही काही केली नाही. तर उलट नि.मातोश्री रमाबाई सोसायटी व सदर व्यवहारासंबधी, परत मनमानी, खोटे-नाटे व बेकायदा असंबध तोंडी अत्यंत चुकीचे युक्तीवाद केले. मात्र, आंदोलनकर्त्यांनी त्यास सडेतोड व लेखी कायदेशीर पुरावे- खुलासे सादर केले. आणि कांही व्यवसायी भ्रष्ट लोक हे सत्य आणि कायदा असा नाकारत असतील तर, आपण जाहीर ...पान ६ वर

# 'आजादी का अमृत महोत्सव' सायकल रॅलीचे पालघर जिल्हयामध्ये भव्य स्वागत



**पालघर/प्रतिनिधी**

सन २०२१ हे वर्ष भारतामध्ये स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणुन साजरे केले जात आहे. या अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन विविध उपक्रम राबवित आहे. याच काळामध्ये केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाकडून भारताच्या विविध भागांमधुन राष्ट्रीय एकता सायकल रॅली आयोजित करण्यात आलेल्या आहेत. या सायकल रॅली भारताच्या वेगवेगळया सरहद्दीवरुन सुरु झालेल्या आहेत. अमृतसर, लखनऊ, कलकत्ता, त्रिवेंद्रम अशा विविध ठिकाणावरुन निघालेल्या या राष्ट्रीय एकता दिवस अनषंगाने व आजादी का अमृत महोत्सब याचे औचित्य साधुन निघालेल्या सर्व सायकल रॅली ३१ ऑक्टोबर रोजी केवडीया, गुजरात राज्य या ठिकाणी एकत्रीत येणार आहेत. तेथील सरदार सरोवरमध्ये असलेल्या लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल याच्या भव्य पुतळयाजवळ राष्ट्रीय एकता दिवसाचे आयोजन दिनांक ३१ ऑक्टोबर रोजी करण्यात आलेले आहे. ३१ ऑक्टोंबर सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्मदिवस आहे आणि हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणुन साजरा केला जातो.

सीआयएसएफ म्हणजेच केंद्रीय औदयोगिक सुरक्षा बल यांच्याकडुन आयोजित करण्यात आलेली सायकल रॅली त्रिवेंद्रम केरळ येथुन दिनांक २९ सप्टेंबर २०१९ रोजी निघाली आहे. सदरची सायकल रॅलीने काल दिनांक २२ ऑक्टोंबर रोजी पालघर जिल्हयामध्ये प्रवेश केला व मनोर येथे मुक्काम करण्यात आला. सदरची सायकल रॅली आज रोजी वरई फाटा, ...पान ६ वर

# अंध वैद्य रोकडेंची डोळस धडपड! माळावर थाटले वनौषधी उपचार केंद्र



**उस्मानाबाद/प्रतिनिधी**

फळफळांसह वनौषधींची लागवड, संगोपन करुन, पर्यावरण जपत, त्याचा माणसाच्या व्याधी दूर करण्यासाठी उपयोग व्हावा या उदात्त हेतूने ६५ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून अंध वैद्यराज तुकाराम रोकडे यांनी आपसिंगा (ता.तुळजापूर) येथील माळरानावर वरवटी रोडवर यापूर्वी पाचशे झाडे वाढविली असून, आता वनौषधी उपचार केंद्र सुरु करुन डोळस समाजसेवेचा आदर्श ठेवला आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी प्रा.डॉ.सुरेश सोनोने व वैशाली सोनोने यांच्या हस्ते या केंद्राचा व नामफलकाचा फित कापून आरंभ करताना डॉ.सोनोने यांनी, अंध वैद्य रोकडे यांची पर्यावरण रक्षणासोबत मानसाच्या व्याधीवर उपचार करण्याची धडपड ही कौतुकापलिकडची असल्याचे सांगितले. वन विभागातील माजी कर्मचारी विलास म्हेत्रे यांनी अशी वृक्षसेवा करणारा माणूस दिसत नाही, असे कौतुक केले. तर बाळू बिडवेंनी माझ्या गावच्या अंधाची कर्तबगारी लाख मोलाची असल्याचे सांगितले. तुकाराम रोकडे यांनी माझ्या वडीलांनी डोक्यावर जळणाची मोळी वाहून गाव सेवा केली, त्यांच्या सेवेचा ...पान ६ वर

# दक्षिण सोलापूर मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी चौथ्यांदा पंचाक्षरी स्वामी

**सोलापूर/प्रतिनिधी**

दक्षिण सोलापूर तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी चौथ्यांदा पंचाक्षरी स्वामी यांची तर उपाध्यक्षपदी पंचप्पा धनशेट्टी आणि सचिवपदी बिसलसिध्द काळे, कार्याध्यक्षपदी अशोक सोनकंटले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पत्रकार संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापुरातील हॉटेल सोनामध्ये खेळीमेळीच्या वातावरणात पत्रकार संजीव इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी विविध विषयांच्या चर्चेनंतर नूतन अध्यक्षपदाच्या निवडीची चर्चा करण्यात आली. यावेळी अध्यक्षपदासाठी पंचाक्षरी स्वामी यांचे नाव इंगळे यांनी सुचवले त्यांस अब्दुल रज्जाक बागवान यांनी अनुमोदन दिले. यावेळी उपाध्यक्षपदी पंचप्पा धनशेट्टी आणि सचिवपदी बिसलसिध्द काळे, कार्याध्यक्षपदी अशोक सोनकंटलेयांची निवड करण्यात आली. निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी नूतन कार्यकारणीत अध्यक्ष : पंचाक्षरी स्वामी, उपाध्यक्ष : पंचप्पा धनशेट्टी, सचिव : बिसलसिध्द काळे, कार्याध्यक्ष : अशोक सोनकंटले, खजिनदार : आनंद बिराजदार, सहसचिव : इरप्पा बोरीकरजगी, प्रमुख संघटक : शिवदास वाडकर, सहसंघटक : तुकाराम शेंडगे, प्रसिद्धीप्रमुख : धोंडप्पा रूपनुरे, महमद शेख, सदस्य : अनिल कापसे, अमोल साळुंखे, संदीप येरवडे, गिरमल्ला गुरव, शिवराज मुगळे, महेश पवार, मनिष केत, नारायण चव्हाण, संजीव इंगळे, अब्दुल रज्जाक बागवान, सुरेश वाघमोडे, इरण्णा गंचिनगोटे आदीजण उपस्थित होते.

# नादुरुस्त वाहनांमुळे राज्य परिवहनला उतरती कळा



**वाडा/प्रतिनिधी**

दीड वर्षाच्या लॉकडाऊन परिस्थिती नंतर हळूहळू पूर्वपदावर येऊ पहात असलेल्या राज्य परिवहनच्या वाहनांची दुरुस्ती व देखभाली अभावी उतरती कळा लागल्याचे जाणवत आहे. वाड्यात येणाऱ्या व जाणाऱ्या वाडा व्यतिरिक्त इतर आगाराच्या गाड्याही निव्वल दुरुस्ती अभावी बंद पडत असल्याच्या दिसून येत आहेत. परिणामी याचा त्रास प्रवाशांना सहन करावा लागत आहे तर बरेच प्रवाशी खाजगी वाहतुकीकडे वळत आहेत.याचा आर्थिक फटका राज्य परिवाहनला सोसावा लागत आहे. शनिवारी (दि.२३ ऑक्टोबर) सकाळच्या सुमारास ठाण्याहून येणारी व वाडा जव्हार मार्गे नाशिकला जाणारी बस क्रमांक (एम.एच.२०) ही बस वाडा बस स्थानकातून बाहेर पडत असतांना बंद पडली तिला मागे ढकलत चालू करण्याचा प्रयत्न केला मात्र चालू झाली नसल्याने ती येथील खड्ड्यात अडकून पडली, शेवटी दुसऱ्या बसच्या बॅटरीचे वायर या बसला लावून ती चालू झाली व आपल्या पुढील प्रवासाला रवाना झाली. हीच बस जव्हार च्या पुढे एखाद्या घाटात बंद पडली तर याचा त्रासही प्रवाशांना होणार आहे. अनेक बस या नादुरुस्त असल्याने रद्द केल्या आहेत तर गाड्यांच्या दुरुस्तीसाठी सुट्टे भाग ...पान ६ वर

# पालघर पोलीस दलाकडून हुतात्मा स्मृती दिनानिमित शहीद जवानांना श्रद्धांजली!



**पालघर/प्रतिनिधी**

पोलीस हुतात्मा दिनी चीनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या १० जवानांना पालघर पोलीस दलातर्फे श्रद्धांजली वाहण्यात आली. २० ऑक्टोंबर १९५९ रोजी भारताच्या सीमेवरील लेह लदाख येथे बर्फाच्छादित व निर्जन अशा हॉट स्प्रिंग या ठिकाणी गस्ती करिता गेलेले दोन कर्मचारी परतले नाहीत म्हणून २१ ऑक्टोबर १९५९ रोजी त्यांच्या शोधाकरिता इंडो तिबेट बोर्डर पोलिसांचे दिवायएसपी करणसिंग यांच्या नेतृत्वाखालील की आरपीएफ आणि आयटीबीपीचे दोन अधिकारी व २० कर्मचारी पाठवण्यात आले. त्यावर तेथे दाबा धरून बसलेल्या चीनी सैन्याने हल्ला केला. या वेळी आमच्या त्या जवानांनी कडवा संघर्ष केला मात्र त्यातील १० जवानांना वीरमरण आले त्यांच्या स्मरणार्थ २१ ऑक्टोबर हा दिवस पोलीस हुतात्मा दिवस पाळला जातो पालघरमध्ये या दिवशी शीड जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली. या प्रसंगी पालघरचे जिल्हाधिकारी माणिक गुरसाळ, पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे, ...पान ६ वर

# जिल्हा बँक निवडणूक प्रकरणी राज्यापालाकडे तक्रार करणार -आम.कराड




**लातूर/प्रतिनिधी**

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत अधिकाऱ्यांना हाताशी धरून सत्ताधाऱ्यांनी व स्वतःला सहकार महर्षी म्हणवून घेणाऱ्या पुढाऱ्यांनी भाजपासह सर्व विरोधी उमेदवाराचे अर्ज बाद करण्याचे षडयंत्र रचून लोकशाहीचा खुन केला आहे असा आरोप करून हुकूमशाही पध्दतीने वागणाऱ्या अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची परवानगी मिळावी यासाठी राज्याचे महामहीम राज्यपाल आणि केंद्रीय सहकारमंत्री मा. अमित शहा यांची भेट घेणार आहोत अशी माहिती भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांनी पत्रकार परिषदेत दिली. लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ पंचवार्षीक निवडणूकीसाठी गेल्या ११ ते १८ ऑक्टोबर दरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. या अर्जाची २० ऑक्टोबर रोजी छाननी होवून भाजपासह सर्व विरोधी उमेदवारांचे सहकार बोर्डाच्या बेबाकीसह इतर किरकोळ कारणावरून अर्ज बाद करण्याचे कटकारस्थान अधिकाऱ्यांना हाताशी धरून सत्ताधाऱ्यांनी केले असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, बँकेत तुमचे चांगले काम होते तर लोकशाही पध्दतीने निवडणूकीला सामोरे जायला हवे होते मात्र तसे घडले नाही. बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीच्या सर्व जागा लढण्याची पुर्णपणे तयारी आम्ही केली होती. बँक आमच्या ताब्यात येणार होती याची कुणकूण लागल्याने सर्व विरोधकाचे अर्ज बाद करण्यात आले. हिम्मत असेल तर निवडणुक होवू द्या. मतदाराने दिलेला कौल आम्हाला मान्य असेल पण निवडणुक टाळून मतदारांच्या अधिकारावर का गधा आणता असा सवाल आ. रमेशअप्पा कराड यांनी उपस्थित केला. बँकेची निवडणूक होवू द्यायची नाही. यासाठी विरोधी उमेदवारांना सोसायटी व इतर सर्व कागदपत्रे उपलब्ध होण्यास अडचणी निर्माण केल्या गेल्या असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, २० ऑक्टोबर रोजी छाननीच्या वेळी अनेक अडचणीवर मात करून मिळविलेले बेबाकी प्रमाणपत्र दाखल करून घेण्यास नकार दिला. त्यामुळे विरोधकांचे अर्ज बाद ठरविण्याची बेकायदेशिर प्रक्रिया सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली अधिकाऱ्यांनी पार पाडली आहे. सत्ताधारी पॅनचे उमेदवार धिरज देशमुख, बाबासाहेब पाटील, गोविंद बोपनीकर यांच्यावर विरोधकाकडून गंभीर स्वरूपाचे आक्षेप छाननीच्या वेळी घेतले. त्यावर कुठलीही चर्चा न होता विरोधकांचे आक्षेप फेटाळून लावण्यात आले. २२ ऑक्टोबर दुपारी ५ पर्यंत अर्ज बाद केल्याची कारणे लेखी ...पान ६ वर